# बीडला पाणीदार जिल्हा बनवणार -मुख्यमंत्री

## घाटशिळ पारगाव येथे नारळी सप्ताहासाठी उपस्थिती

**बीड : प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात संत वामनभाऊ यांनी सुरू केलेली सप्ताहाची परंपरा अखंडपणे ९३ वर्षापासून सुरू आहे. या परंपरेच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. गहिनीनाथ गडाचा विकास करताना बीड जिल्ह्याला पाणीदार जिल्हा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



शिरूर कासार तालुक्यातील घाटशिळ पारगाव येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ९३ व्या नारळी सप्ताहासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या वेळी व्यासपीठावर पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मठाधिपती विठ्ठल बाबा महाराज, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, आमदार सर्वश्री सुरेश धस, श्रीमती नमिता मुंदडा, मोनिका राजळे, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, माजी आमदार भीमराव धोंडे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा, जिल्हाधिकारी अविनाश पाठक उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, गहिनीनाथ गडाच्या विकासाचे काम सुरू असून अजूनही पुढे विकासाची ही कामे करायची आहेत. संतांनी दाखविलेला भक्तीचा मार्ग समाजाने सोडलेला नाही. समाज घडविणाऱ्या या परंपरेत समाजातील सर्व घटकांचा सहभाग दिसून येत आहे. यामध्ये मुस्लिम समाज बांधवदेखील सहभागी झाले, याचा आनंद आहे. आमचे नेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्यामुळे बीड जिल्ह्याशी वेगळे नाते निर्माण झाले आहे. आज मला वामनभाऊंच्या या सप्ताहाच्या परंपरेत सहभागी होऊन आशीर्वाद घेता आला याचा मनस्वी आनंद असल्याचे ते म्हणाले.

गहिनीनाथ गडासोबतच या परिसरातील भाविकांच्या सोई सुविधांचा तसेच या परिसराचादेखील विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगून फडणवीस म्हणाले, मराठवाडा व बीड जिल्ह्याला कायमस्वरुपी दुष्काळमुक्त करण्यासाठी शासनाने कृष्णेचे पाणी आष्टीपर्यंत आणले आहे. ते पाणी संपूर्ण बीड जिल्ह्यात पोचविण्याचा आपला प्रण आहे. मराठवाडा व बीड जिल्ह्याला पाणीदार करण्यासाठी ५३ टीएमसी पाणी गोदाखोऱ्यात आणण्याच्या आराखड्यालादेखील मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे या परिसरातील दुष्काळ कायमचा मिटेल. आजच्या या पिढीने दुष्काळ पहिला, तो पुढच्या पिढीला पाहू देणार नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर खोपोली बाह्यवळणावर ट्रकचा अपघात

## क्लिनर ठार; चालक बचावला

**खोपोली : प्रतिनिधी**

बाजरीच्या गोणीने भरलेल्या ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने मुंबई पुणे एक्सप्रेसवेर खोपोली बाह्यवळणारील ब्रिजखालीच ट्रक डाव्या बाजू झालेलाला उलटल्याने या गंभीर अपघातात क्लिनर ठार तर चालक बचावला आहे. अपघात शनिवारी (दि.१९) घडला आहे.या अपघातात बाजरीच्या गोणी रस्त्यावर पसरल्याने थोडावेळ वाहतुक कोंडी झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसारबसव कल्याण बिदर डिस्टिक कर्नाटक येथून बाजरीच्या गोणीने भरलेला ट्रक मुंबईकडे निघाला होता.



मुंबई पुणे एक्सप्रेसवेरून खोपोली बाह्यवळ घेत असतानाच ट्रकचा ब्रेक झाला होता.ट्रक चालकाने प्रसंगसावधता राखत ट्रक ब्रिजखाली थांबविण्याचा प्रयत्न केला, परंतु ट्रकमध्ये बाजरीच्या वजनदार गोणी असल्यामूळे ट्रक डाव्या बाजूला उलटल्याने ट्रकचा चेंदामेंदा झाल्याने केबिनमध्येआडकून क्लिनर रघुनाथ प्रभू (वय ३३) ठार झाला तर ट्रकचालक अनिल म्हेत्रे बचावला आहे.

अपघातस्थळी वाहतूक पोलिस,खोपोली पोलिस, अपघातग्रस्त पोहचले क्रेनच्या सह्याने ट्रक बाजूला करीत दोघांना बाहेर काढण्यात आले. मयत आणि जखमी चालकाला खोपोली नगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर रूग्णालयात दाखल करण्यात आले होते

# वर्षभरात पावणे तीन लाख ग्राहकांना नवीन वीजजोडणी सुलभ व तत्काळ सेवा

**कल्याण : प्रतिनिधी**

'सुकर जीवनमान' (इझ ऑफ लिव्हिंग) संकल्पनेनुसार वीजग्राहकांना उत्तम सेवा देण्याबरोबरच नवीन ग्राहकांना तत्काळ वीजजोडणी देण्यासाठी महावितरण प्रयत्नशील आहे. त्या अनुषंगाने कल्याण आणि भांडुप परिमंडलात घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, कृषी अशा विविध वर्गवारीतील दोन लाख ७३ हजारांहून अधिक ग्राहकांना गेल्या आर्थिक वर्षात नवीन वीजजोडणी देण्यात आली.

नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सरकारने 'इझ ऑफ लिव्हिंग' संकल्पना आणली आहे. वीज ही आज मुलभूत गरज बनलेली असल्याने अखंडित आणि दर्जेदार वीजपुरवठ्याचा समावेश या संकल्पनेत करण्यात आलेला आहे. त्यानुसार कल्याण व भांडुप परिमंडलामध्ये महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिलेले निर्देश आणि वीज नियामक आयोगाने निर्धारीत केलेल्या कृती मानकांनुसार विहित कालावधीत नवीन वीजजोडणी देणे, अखंडित व दर्जेदार वीजपुरवठ्यासह ग्राहकांच्या तक्रारी प्राधान्याने सोडविण्यावर भर देण्यात आला आहे.

कल्याण परिमंडलात २०२४-२५ या आर्थिक वर्षात विविध वर्गवारीतील सिंगल फेजचे एक लाख ३८ हजार ५७० आणि थ्री फेजचे ११ हजार ९०१ असे एकूण एक लाख ५० हजार ४७१ नवीन ग्राहक महावितरणने जोडले आहेत. यात कल्याण मंडल कार्यालय एक अंतर्गत ३१ हजार ९०५, कल्याण मंडल दोन कार्यालयांतर्गत ३९ हजार २३९, वसई मंडलांतर्गत सर्वाधिक ५३ हजार ७१० आणि पालघर मंडलातील २५ हजार ६१७ नवीन वीज जोडण्यांचा समावेश आहे.

भांडुप परिमंडलात गत आर्थिक वर्षात विविध वर्गवारीतील सिंगल फेजच्या एक लाख ३ हजार ९२५ आणि थ्री फेजच्या १९ हजार ११ अशा एकूण एक लाख २२ हजार ९३६ नवीन वीजजोडण्या देण्यात आल्या. यात वाशी मंडल कार्यालयांतर्गत सर्वाधिक ५२ हजार ४७२, ठाणे शहर मंडलांतर्गत ३३ हजार ६५७ आणि पेण मंडल कार्यालयांतर्गत ३६ हजार ८०७ नवीन वीज जोडण्यांचा समावेश आहे.

# सिडको एमडींनी घेतला नवी मुंबई विमानतळ प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी गुरुवारी (दि.१७) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासंदर्भात आढावा बैठक घेतली. या वेळी सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल आणि मुख्य महाव्यवस्थापक गीता पिल्लई उपस्थित होते.

सिंघल यांनी अदानी समूह संचालक-एअरपोर्ट जीत अदानी यांच्यासमवेत संचालक मलय महादेवया, एनएमआयएएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी बीव्हीजीके शर्मा, एल अ‍ॅण्ड टीचे उपाध्यक्ष तथा परिचालन



प्रमुख एन. नामचिवायम यांच्या उपस्थितीत प्रकल्पाच्या परिचालन सुसज्जतेचे परीक्षण करण्याकरिता आढावा बैठक घेतली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासंबंधी विमानतळ माहिती प्रकाशन (एआयपी) प्रकाशित झाल्यापासून व संचालक, नागरी विमान उड्डाण (डीजीसीए) यांच्याकडून विमानतळ अनुज्ञप्तीकरिता देण्याकरिता निरीक्षण सुरू असल्याने विमानतळाचे उद्घाटन व परिचालन करण्याच्या दृष्टीकोनातून एअरसाइड, लॅन्डस्लाइड आणि टर्मिनल इमारत यांचे काम पूर्ण करणे, कामे पूर्ण करण्यासंदर्भात येणारी आव्हाने जाणून घेणे व या आव्हानांवर मात करून नियोजित वेळेत कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून आढावा बैठकीमध्ये भर देण्यात आला.

एनएमआयएएल यांनी एअरसाइडचे काम १०० टक्के पूर्ण झाले असून डीजीसीए यांच्याकडून विमानतळ अनुज्ञप्ती व बीसीएएस यांच्याकडून सुरक्षाविषयक परवानगी प्राप्त करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर असून याबाबत कोणतेही अडथळे नसल्याबाबत ग्वाही दिली. अव्याहत परिचालन सुनिश्चित करण्याकरिता परिचालन सुसज्जता आणि हस्तांतरण (ओआरएटी) चाचणी नियमितपणे सुरू आहे. विविध विमान कंपन्यांनी नवीन विमानतळावर आपल्याला वेळ (स्लॉट) उपलब्ध व्हावी याकरिता अर्ज केला असून डीजीसीए समितीकडून या वेळा निश्चित करण्यात येणार आहेत.

सिंघल यांनी विमानतळाकरिता भारतीय महामार्ग प्राधिकरण आणि सिडको यांच्यातर्फे विकसित करण्यात येत असलेल्या रस्ते कनेक्टिव्हिटी प्रकल्पाचा देखील आढावा घेतला व विमानतळाचे उद्घाटन होण्यापूर्वी हा प्रकल्प सज्ज करण्याबाबत संबंधितांना निर्देश दिले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा सामाजिक उपक्रम

## खारघर येथील गिरीजा वेल्फेअर अनाथाश्रमाला भेट




**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हे नेहमी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळे सामाजिक, पर्यावरणीय व शैक्षणिक उपक्रम घेत असते याचाच एक भाग म्हणून शनिवारी (दि.१९) मॅनेजमेंट स्टडीज विभाग व मॅनेजमेंट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने खारघर येथील गिरिजा वेल्फेअर अनाथाश्रमाला भेट दिली.

या भेटीपूर्वी महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थी व शिक्षक यांनी त्यांच्या घरातील कपडे इतर गरजेच्या वस्तू व शैक्षणिक साहित्य जमा केले होते तसेच या वेळी जमा केलेले सर्व साहित्य विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले आले. या सामाजिक उपक्रमाचा प्रमुख उद्देश गिरिजा वेल्फेअर अनाथ आश्रमातील गरजू, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत व प्रेरणा मिळावी हा होता. या सामाजिक उपक्रमाचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी मॅनेजमेंट स्टडीज विभागातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी तसेच मॅनेजमेंट असोसिएशनमधील सर्व सदस्य यांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. रीत थुले यांनी केले तसेच प्रा. रेवान शिंदे, प्रा. शिवानी मानकामे, प्रा. स्नेहा नाईक, प्रा. शीतल चव्हाण, प्रा. श गुप्ता शान, प्रा. अर्पिता नायक, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# कोकण विकास महोत्सवाची तयारी

**चौक : प्रतिनिधी**

कोकण विकास समितीच्या अंतर्गत कोकण विकास महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. २३ ते २७ एप्रिल २०२५ या कालावधीत मुंबई मुलुंड येथे आयोजन करण्यात आले असल्याचे कोकण विकास परिषदेने कळविले आहे.

गेली अनेक वर्षे कोकण विकास समितीच्या माध्यमातून शैक्षणिक, शैक्षणिक विकास स्पर्धा परीक्षा, आधुनिक आरोग्य सुविधा, रस्ते विकास, रेल्वे प्रश्न, पर्यटन विकास, आधुनिक शेती, कोकण ते घाटमाथा यांच्या विविध विषयांवर कोकणातील जनतेच्या हितासाठी व सहकार्याने पाठपुरावा करीत आहे.

महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारसा जपणे, साहित्याला प्रोत्साहन देणे, उच्च व तंत्रज्ञान, तंत्रशिक्षण, संशोधन क्षेत्राचा विकास,कला, क्रीडा, नृत्य कलाकृती, खाद्य संस्कृती,खाद्य व्यावसायिक, गृह पाहुणचार, कोकणची संस्कृती चालीरीती या बाबत सर्व सामान्य माणसाला व जगाच्या कानाकोपऱ्यात पोचविण्याचा मानस आहे. त्याच प्रमाणे कोकण मेवा, कोकण संस्कृती, कोकणातील भूमी उद्योजक, विकलांग विकास संस्था, कोळी, आदिम वारली इ. विषयांची माहिती पोचविण्याचा प्रयत्न या महोत्सवाच्या माध्यमातून होणार आहे.

हा महोत्सव २३ एप्रिल २०२५ ते २७ एप्रिल २०२५ दरम्यान छत्रपती संभाजी राजे सांस्कृतिक भवन मुलुंड (पूर्व) मुंबई येथे संस्थापक अध्यक्ष जयवंत दरेकर यांच्या नेतृत्वाखाली होणार असल्याचे सहसचिव मंगेश महाडिक यांनी कळविले आहे. या महोत्सवाला कला, क्रीडा, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे नमूद केले आहे.

# ठाणे-वाशी ट्रान्स हार्बर आज साडेपाच तास बंद

**मुंबई : प्रतिनिधी**

विविध अभियांत्रिकी कामांसाठी मध्य रेल्वेने रविवारी (दि.२०) मेगाब्लॉकची घोषणा केली आहे. या वेळी ठाणे-वाशी ट्रान्स हार्बर मार्ग साडेपाच तास अप आणि डाऊन दिशेने बंद राहणार आहे. लोकल १० ते १५ मिनिटे विलंबाने धावतील. पश्चिम रेल्वे मार्गावर रविवारी ब्लॉक नाही.

सीएसएमटी ते विद्याविहारदरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर सकाळी १०.५५ ते दुपारी ३.५५ सेवा बंद राहील. ब्लॉकनंतर पहिली लोकल सीएसएमटी येथून १५.५७ वाजता सुटेल. सीएसएमटीसाठी ब्लॉकपूर्वीची शेवटची लोकल कल्याण येथून ०९.१३ वाजता, तर ब्लॉकनंतर पहिली लोकल कल्याण येथून १५.१० वाजता सुटेल.

ठाणे ते वाशी, नेरुळदरम्यान अप आणि डाऊन ट्रान्स हार्बर मार्गावर सकाळी ११.१० ते संध्याकाळी ४.१० (५.०० तास). ठाण्याहून वाशी, नेरुळ, पनवेल येथे जाणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील सेवा सकाळी १०.३५ ते संध्याकाळी १६.०७पर्यंत रद्द राहतील. पनवेल, नेरुळ, वाशी ते ठाणे अप हार्बर मार्गावरील सेवा १०.२५ वाजता वाशी ते नेरुळ १६.०९ वाजता रद्द करण्यात येतील.

# मध्य रेल्वेचा १७२ वर्षांचा गौरवशाली प्रवास

**रोहे : प्रतिनिधी**

भारतीय रेल्वेने १७२ गौरवशाली वर्षे पूर्ण केली आहे. दिनांक १६ एप्रिल १८५३ रोजी मुंबई आणि ठाणेदरम्यान चालणारी आशिया उपखंडातील (आणि भारतात) पहिली ट्रेन बोरीबंदर (सध्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जिथे आहे) येथून सुरू झाली. जसजशी वर्षे उलटत गेली तसतसे, पहिली ट्रेन चालवणारी ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वे १९०० मध्ये इंडियन मिडलँड रेल्वे कंपनीमध्ये विलीन झाली आणि उत्तरेला दिल्ली, ईशान्येस कानपूर आणि अलाहाबाद आणि पूर्वेला नागपूरपासून आग्नेयेला रायचूरपर्यंत तिच्या सीमा वाढत गेल्या.

दिनांक ५ नोव्हेंबर १९५१ रोजी, निजाम राज्य, सिंधिया राज्य आणि धौलपुर राज्य रेल्वे एकत्रित करून मध्य रेल्वेची स्थापना करण्यात आली. सध्या मध्य रेल्वेचे मुंबई, भुसावळ, नागपूर, सोलापूर आणि पुणे या ५ विभागांसह महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि कर्नाटक या राज्यांमध्ये ४३२२.५५ (रुट) किमी पेक्षा जास्त मार्गांचे नेटवर्क आहे. मध्य रेल्वे ४९२ स्थानकांद्वारे या राज्यांना सेवा देत आहे.

एप्रिल १८५३ मधील पहिल्या ट्रेनपासून ते भारतातील सर्वात आधुनिक ट्रेन, वंदे भारत एक्सप्रेसपर्यंत, रेल्वेने गेल्या १७२ वर्षांत आपले नेटवर्क यशस्वीरित्या वाढवले आहे. सध्या मध्य रेल्वे १० वंदे भारत एक्सप्रेस गाड्या चालवते, जसे की छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- साईनगर शिर्डी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- सोलापूर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- मडगाव, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- जालना, नागपूर- बिलासपुर, नागपूर- इंदूर, नागपूर -सिकंदराबाद, कलबुरगि -बेंगळुरू, पुणे- हुब्बल्लि आणि पुणे- कोल्हापूर वंदे भारत एक्सप्रेस.

नेरळ- माथेरान लाईट रेल्वेनेही आपली गौरवशाली ११८ वर्षे पूर्ण केली आहेत. नेरळ-माथेरान रेल्वेचे बांधकाम १९०४ मध्ये सुरू झाले आणि १९०७ मध्ये दोन फूट गेज असलेला रेल्वे मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. खबरदारीचा उपाय म्हणून, पावसाळ्यात ही रेल्वे बंद असायची, परंतु अमन लॉज आणि माथेरान दरम्यानची शटल सेवा दिनांक २९.९.२०१२ पासून सुरू करण्यात आली, जी पावसाळ्यातही चालविण्यात येते. नेरळ-माथेरान एनजी मार्गावरील प्रवाशांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवास आणि सेवा सुनिश्चित करण्यासाठी मध्य रेल्वेने या विभागात अनेक पायाभूत सुविधांची कामे हाती घेतली आहेत.

# माथाडी हमाल संघटनांचा संप; रेशन धान्य पुरवठा बंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

माथाडी हमाल संघटनांच्या संपामुळे रेशन दुकानांवरील धान्य पुरवठा बंद झाला आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील रेशन दुकानातील धान्यसाठा संपल्याने दुकांनाना टाळे लागले आहे. महिना उलटला तरी रायगड जिल्ह्यातील हमाल संघटनांशी यशस्वी वाटाघाटी करण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. गोरगरीब लाभार्थींना रेशनवरील धान्याच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे.

रायगड जिल्ह्यात दरमहा आठ हजार मेट्रिक टन तांदूळ आणि २३०० मेट्रिक टन गव्हाचे वितरण होते. हमालांच्या संपामुळे जिल्ह्यातील २१ सरकारी गोदामांतील कामकाज ठप्प झाले असून रेशन दुकानांवर धान्याचा पुरवठा थांबला आहे. यामुळे रेशन दुकानदार आक्रमक झाले आहेत. ग्रामीण भागातील गोरगरीब लाभार्थ्यांना सरकारी रेशनपासून वंचित रहावे लागत आहे. शिवाय रेशन दुकानदारांनाही याचा फटका बसतो आहे. संपामुळे जिल्ह्यातील रास्त भाव दुकानदारांचेदेखील एकूण अंदाजे दीड कोटींचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.


या संपाचा थेट परिणाम जिल्ह्यामध्ये मुख्यत्वे ग्रामीण भागातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर झाला आहे. जिल्हा पुरवठा प्रशासनाने ४ एप्रिल २०२५ रोजी नोटीस दिली असतानाही हमाल संस्थांनी काम सुरु केलेले नाही. यामुळे भारतीय अन्न महामंडळाच्या कळंबोली व तळोजा येथील धान्यवाहने गोदामांबाहेरच उभी आहेत. तसेच दुसऱ्या टप्प्यातील वाहतूक पूर्णतः ठप्प झाली आहे. आजही जिल्ह्यातील १५७ दुकानदारांना मार्च महिन्याचे धान्य प्राप्त झालेले नाही, व त्यामुळे लाभार्थ्यांना या धान्याचे वाटप करता आलेले नाही. जिल्ह्यातील एकूण एक हजार ४५० रास्त भाव दुकानांपैकी शहरी भागातील १४७ दुकानांच्या थेट वाहतुकीखेरीज, ग्रामीण भागात एक हजार ३०३ दुकानांमध्ये एप्रिल महिन्याचे धान्य अजूनही पोहचलेले नाही.

> **पुरवठा व्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तांत्रिक दृष्टिकोन, आवश्यक प्रशासनिक समज व पुरवठा विभागाचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या अधिकाऱ्याची नियुक्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने रास्त भाव दुकानांमध्ये अन्नधान्य पोहचवण्यासाठी तात्काळ पर्यायी व्यवस्था करावी.**
>
> **-प्रमोद घोसाळकर, अध्यक्ष, रेशन दुकानदार संघटना**

आज यासंदर्भात जिल्ह्यातील रास्तभाव धान्य दुकानदाराच्या संघटनेची बैठक पार पडली या बैठकीत रेशनवरील धान्य पुरवठा बंद झाल्याबददल चिंता व्यक्त करण्यात आली. यावर तातडीने उपाययोजना न केल्यास जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा रेशन दुकानदार संघटनेने दिला आहे.

## दुखवटा

### सत्यवती कवळे



**अलिबाग :** स्वातंत्र्यसैनिक पांडुरंग बाळू कवळे यांच्या पत्नी सत्यवती पांडुरंग कवळे यांचे शुक्रवारी (दि.१८) निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर श्रीबाग स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. जगदीश कवळे, श्रीकांत कवळे यांच्या त्या मातोश्री होत.

### शांताबाई गोंधळी



**पनवेल :** तालुक्यातील जावळे येथील शांताबाई रघुनाथ गोंधळी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रिया विधी शनिवारी (दि.२६) श्री क्षेत्र नाशिक येथे होणार असून उत्तरकार्य मंगळवारी (दि.२९) राहत्या घरी जावळे येथे होणार आहे. कै.शांताबाई यांच्या पश्चात मुले, मुली, सून, नातू, नात असा मोठा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते चिंतामण गोंधळी यांच्या कै.शांताबाई ह्या आई होत.

## निवडक

### टँकरच्या धडकेत मुलाचा मृत्यू

**पनवेल :** पाण्याच्या टँकरने दिलेल्या धडकेत दुचाकीवरून पडून ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची घटना तळोजा येथील भुयारी मार्गाजवळ घडली. हर्षदीप पंकज पाटील असे मुलाचे नाव असून, तो तळोजा फेज-१ मुधील देव आशिष बिल्डिंगमध्ये कुटुंबासह राहण्यास होता. दोघे पिता-पुत्र खारघर येथून परतीच्या मार्गावर असतांना तळोजा भुयारी मार्गाजवळ पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या पाण्याच्या टँकरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यामध्ये दुचाकीच्या पाठीमागे बसलेला हर्षदीप खाली पडला आणि त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. रुग्णालयात दाखल करण्याअगोदर त्याचा मृत्यू झाला. या अपघातानंतर टँकर चालक पळून गेला असून, पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे.

### खारघरमधून एक जण बेपत्ता

**पनवेल :** कामाच्या ठिकाणावरुन एक व्यक्ती कुठेतरी निघून गेल्याने तो अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. राममल्ला



ठकूरी (५६) असे या व्यक्तीचे नाव असून तो गुडहील बिल्डींग खारघर या ठिकाणी कामाला होता. तेथून तो कुठेतरी निघून गेला आहे. उंची पाच फुट, रंग गोरा, केस सफेद काळे, नाक सरळ, डोळ्यावर चष्मा, समोरील एक दात पडलेला आहे. अंगात आकाशी रंगाचा चौकडीचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट, पायात चप्पल तसेच त्याला नेपाळी व हिंदी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खारघर पोलीस ठाणे किंवा पो.ना.एस.एम. पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

### ड्रोनप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** बेकायदेशीररित्या विना परवाना ड्रोन उडविल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेलमधील प्रतिबंधित असलेल्या ओएनजीसी फेज २ मधील प्रोसेस लॅबच्या मागील बाजूस एका अज्ञात व्यक्तीने विनापरवाना ड्रोन कॅमेरा उडविल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

### कारच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**पनवेल :** एका कारने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात २१ वर्षीय कुमार अब्दुल मोहीम वसीम सिद्दिकी (तळोजा) हा जखमी झाला. त्यानंतर कारचालक मदतीसाठी न थांबता पळून गेला. या प्रकरणी कारचालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कुमार अब्दुल मोहीम वसीम सिद्दीकी हा स्कुटीवरून सामानाचे डिलिव्हरी करण्यासाठी गेला होता. मिठास कॉर्नरच्या बाजूला सेक्टर १४, फेस वन, तळोजा येथे पार्किंग केलेल्या कारच्या चालकाने कार वेगाने चालवली आणि थेट स्कुटीला धडक दिली. यात कुमार अब्दुल स्कुटीवरून पडला. त्यानंतर कारचालक पळून गेला. या अपघातात अब्दुलच्या उजव्या खांद्याला फॅक्चर झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी कारचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# तळोजा येथे गांजा जप्त

## २० लाख ७६ हजारांच्या मालासह एकाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

नांदेड येथून तळोजा येथे गांजा विक्रीसाठी आलेल्या त्रिकुटापैकी एका तरुणाला तळोजा पोलिसांनी अटक केली आहे. अनिकेत गौतम आवटे (वय १८) असे या तरुणाचे नाव असून त्याचे दोन साथीदार या कारवाईदरम्यान पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत. या कारवाईत पोलिसांनी २० लाख ७६ हजार रुपये किंमतीचा ४१.५३२ किलो ग्रॅम वजनाचा गांजाने भरलेल्या तीन बॅगा जप्त केल्या आहेत. पोलिसांनी आता पळून गेलेल्या दोघांचा शोध सुरू केला आहे.

पनवेल-मुंब्रा मार्गावरुन काही तरुण रिक्षामधुन गांजा हा अमली पदार्थ विक्रीसाठी घेऊन जाणार असल्याची माहिती तळोजा पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस



निरीक्षक बाबु खाटपे, सहाय्यक फौजदार कंखरे, पोलीस हवालदार भोईर, डुंबरे, पोलीस नाईक करडे, पोलीस शिपाई पठाण, पवार आदींच्या पथकाने पनवेल मुंब्रा मार्गावरील धानसर टोल नाका येथे सापळा लावला होता.

या वेळी नांदेड येथून गांजा घेऊन ट्रॅव्हल्स बसने कळंबोली सर्कल येथे उतरलेले अनिकेत, इरफान आणि रईस हे तिघेही रिक्षाने भिवंडी नाका येथे जात असताना, पोलिसांनी धानसर टोलनाक्यावर त्यांची रिक्षा अडवून त्याची तपासणी सुरू केली. याचवेळी इरफान शेख आणि रईस या दोघांनी संधी साधुन रिक्षामधुन पलायन केले. त्यामुळे पोलिसांनी अनिकेत आवटे याला ताब्यात घेऊन रिक्षामध्ये असलेल्या तीन बॅगांची तपासणी केली असता, त्यात तब्बल २० लाख ७६ हजार रुपये किंमतीचा ४१.५३२ किलो ग्रॅम वजनाचा गांजा हा अमली पदार्थ आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी सदर गांजा जप्त करून अनिकेत आवटे याच्याकडे त्याबाबत चौकशी केली असता, अनिकेत व इरफान शेख आणि रईस या तिघांनी नांदेड येथून ट्रॅव्हल्सने गांजा आणल्याचे तसेच भिवंडी नाका येथे गांजा विक्रीसाठी घेऊन जात असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल करून एकाला अटक केली आहे.

# चाणजेत समाजमंदिराचे भूमिपूजन

## *आमदार महेश बालदींच्या निधीतून २५ लाख मंजूर*

**उरण : वार्ताहर**

आमदार महेश बालदी यांच्या आमदार निधीतून २५ लाख रूपये मजूर करून उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील उरण चारफाटा, घोड़बादेवी मंदिराजवळील समाज मंदिराचा पहिला स्लॅप भरण्याचे काम सुरू झाले. असून पुढील काम सुरू आहे. शनिवारी (दि१९) उरण तालुका भाजप अध्यक्ष रवि भोईर यांच्या हस्ते पूजा करून श्रीफळ वाढविण्यात आले.

या वेळी भाजप चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत,चाणजे ग्रामपंचायत सदस्या किंजल कैलास भोईर, भाजप उरण तालुका सरचिटणीस कैलास भोईर, प्रसाद भोईर, संतोष पाटील, माजी सैनिक नरेंद्र बंडा, शर्मिला भोपी, गुलाब तांडेल, अंजनी म्हात्रे, महिला वर्ग आदी उपस्थित होते.



## रिक्षा चोरणाऱ्याला पोलिसांनी घेतले ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर परिसरातून रिक्षा चोरी करणाऱ्या चोरट्यास अवघ्या २४ तासात पनवेल शहर पोलिसांनी रिक्षासह ताब्यात घेतले आहे.

स्वप्नील पवार यांनी त्यांची रिक्षा (एमएच-४६-बीडी-०८३४) ही दर्ग्यासमोरील शाळेजवळ उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने रिक्षा चोरून नेल्याने याबाबतची तक्रार त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली होती.

या तक्रारीनंतर वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.नि. विनोद लभडे, पोहवा नितीन वाघमारे, अविनाश गंथडे, अमोल डोईफोडे, परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, पोना विनोद देशमुख, पोशि चंद्रशेखर चौधरी आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे सदर रिक्षाचा शोध घेत असताना ही रिक्षा कर्नाळा स्पोर्टस् ॲकॅडमी परिसरात उभी असल्याचे समजले. त्यानुसार या पथकाने तेथे जावून सापळा रचून आरोपी मुस्तकीन खान (३२ रा.पनवेल) याला ताब्यात घेतले आहे. याबाबत अधिक तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.





**पनवेल : महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शकुंतला ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप महिला मोर्चा पदाधिकारी लीना पाटील, सपना पाटील, साधना पवार, कविता पाटील, आशा पलोतकर आदी उपस्थित होत्या.**

## रसायनी साई मंदिरात दर गुरुवारी अन्नदान सेवा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्री साईबाबा सत्संग केंद्र रसायनी यांच्यावतीने मोहोपाडा येथील श्री साईबाबा मंदीर एचओसी कॉलनी येथे नित्यनेमाने गेली २५ वर्षे दर गुरुवारी मोफत अन्नदान सेवा सुरू असून येथील अन्नदानाचा पाचशेपेक्षा अधिक नागरिक लाभ घेतात.

प्रत्येक गुरुवारी गोरगरीब भक्त गणांसाठी अन्नदान नित्य निरंतर अखंड सेवा चालू आहे. येथे सेवा मुल्य देऊनही भाग घेता येईल असे येथील श्री साईबाबा सत्संग केंद्राने कळविले आहे. वाढदिवस, पुण्यतिथी, लग्नाचे वाढदिवस व इतर कार्यक्रमांसाठी अन्नदान करता येणार असून नागरिकांनीही अन्नदानासाठी हातभार लावावा, असे आवाहन श्री साईबाबा सत्संग केंद्रांचे अध्यक्ष एम एस मगर (९९६०९४०२४४), उपाध्यक्ष जे.व्हि.आंबवणे (९८५०७५७१२१), उपाध्यक्ष-आर.एम.पोरे (९२२१३८२४८७), सचिवबी.जे.कोंडीलकर (९६८९७७६९७५), खजिनदार एन.बी. गोगडे (९७६७५१६०६०) यांनी केले आहे.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे आज वार्षिक पारितोषिक वितरण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण व सामाजिक संमेलन २०२४-२०२५ रविवारी (दि.२०) सायंकाळी आयोजित करण्यात आले आहे.

रंगीलो भारत - भारताच्या शाश्वत आत्म्याचा उत्सव या आकर्षक संकल्पनेखाली झालेल्या कार्यक्रम होणार आहे. नर्सरी ते इयत्ता बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध पारंपरिक नृत्ये, लोकगीते, नाट्यछटा व संगीत सादरीकरण होणार आहे.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, खारघरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सुरवे, संस्थेचे अध्यक्ष तथा भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष तथा भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, सदस्य तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अमोघ ठाकूर आदींसह नगरसेवक, नगरसेविका, विविध शाळांचे प्राचार्य आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सांस्कृतिक कार्यक्रमासोबतच, या वार्षिक समारंभात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या गौरव होणार आहे. ३३ विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक, क्रीडा व सहशालेय क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीसाठी गौरवण्यात येणार आहे. गुणवंत विद्यार्थ्यांना १०,००० रोख रक्कम व स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती स्कूलच्या प्राचार्य राज अलोनी यांनी दिली.





**कामोठे : मेरी माता चर्चच्या वतीने पवित्र आठवड्याच्या सेवांचा भाग म्हणून शुक्रवारी गुड फ्रायडेनिमित्त कामोठ्यात होली क्रॉसचे रास्ता या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेत आमदार प्रशांत ठाकूर सहभागी झाले होते. फादर जोजो अरक्कल आणि फादर जरीन पल्लिकेतरा यांच्या नेतृत्वाखालीही या यात्रेचे आयोजन करण्यात आले व शेकडो भाविक सहभागी झाले होते.**

# अग्निशमन सेवा सप्ताहांतर्गत वाहन रॅली

## पनवेल महापालिका व सिडकोकडून जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अग्निशमन सेवा सप्ताह २०२५निमित्त नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने पनवेल महानगरपालिका अग्निशमन दल व सिडको अग्निशमन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.१९) नवीन पनवेल ते खारघर अशी भव्य अग्निशमन वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले.



आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या रॅलीची सकाळी १० वाजता नवीन पनवेल अग्निशमन केंद्र येथून सुरूवात करण्यात आली. पनवेल महापालिकेच्या वतीने मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, अग्निशमन अधिकारी हरिदास सुर्यवंशी, उप अग्निशमन अधिकारी संदीप पाटील तसेच महापालिकेतील महिला व पुरुष अग्निशमन कर्मचाऱ्यांनी या रॅलीचे प्रतिनिधित्व केले.

नवीन पनवेल अग्निशमन केंद्र येथून सुरुवात झालेली ही रॅली खांदा कॉलनीमधील ब्रिजमार्गे कामोठे, कामोठे ते महामार्गावरून मंकी पॉइंट खारघर, मंकी पॉइंट ते शिल्प चौक, शिल्प चौक ते रामशेठ ठाकूर शाळा, ग्रामविकास भवन या मार्गाने येत खारघर अग्निशमन केंद्र येथे रॅलीची सांगता झाली.

या रॅलीमध्ये महापालिकेच्या अग्निशमन विभागातील १० बुलेट दुचाकी, चार जीप, दोन स्विफ्ट डिझायर कार, १२ अग्निशमन वाहने सहभागी झाली होती. या रॅली दरम्यान अग्निशमन दल हे सजगतेचे व तत्परतेचे प्रतीक ठरणार आहे, नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे आणि अग्निसुरक्षेबाबत सजग व्हावे, असे आवाहन करण्यात आले. या रॅलीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी ,एकत्र येऊ, अग्निसुरक्षित भारत घडवू, असा संदेश देण्यात आला.

महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या वतीने या सप्ताहादरम्यान विविध प्रात्यक्षिके, कळंबोली डिमार्ट येथे मॉक ड्रिल्स, प्रशिक्षण कार्यक्रम आणि जनजागृती उपक्रम घेण्यात आले. जेणेकरून नागरिक, कर्मचारी, उद्योग आणि संस्था अग्निसुरक्षेबाबत अधिक सजग होतील.

### अग्निसुरक्षेबाबत जागरूकता

***अग्निशमन सेवा सप्ताह दरवर्षी १४ ते २० एप्रिलदरम्यान साजरा केला जातो. १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबईतील व्हिक्टोरिया डॉक येथे झालेल्या दुर्घटनेत ७१ शूर अग्निशमन कर्मचाऱ्यांनी प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या स्मरणार्थ आणि समाजात अग्निसुरक्षेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी हा सप्ताह साजरा केला जातो.***



## कळंबोलीमध्ये मान्सूनपूर्व नालेसफाईची मागणी

### भाजपकडून पमपाकडे पत्रव्यवहार

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली शहरात मान्सूनपूर्व नालेसफाई तसेच पावसाळ्यात पाणी साचून निर्माण होणाऱ्या पुरस्थितीपासून रोखण्यासाठी पंप स्टेशन वाढविण्याची मागणी भाजपचे शहर अध्यक्ष रविनाथ पाटील यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी पनवेल मनपा आयुक्तांकडे निवदेन दिले आहे.

रविनाथ पाटील यांनी निवेदनात म्हटले आहे की, कळंबोली शहर हा चारीही बाजुच्या रस्त्यापासुन दोन मिटर खाली असल्यामुळे प्रत्तेक वर्षी कळंबोली शहरामध्ये एल आय जी के एल - १, के एल ५. से. १०, से. ११ हे परिसरामध्ये व घरामध्ये १ ते २ फुटपर्यंत पाणी भरत असतो तसेच मागील वर्षी कळंबोली शहर पाण्यामध्ये होटते हे आपणास व अधिकारी वर्गाला ज्ञात आहे. त्यामुळे आपण धारण तलाव गाळ काढणे व पंपिग हाऊस तयार करण्याचा विचार केला होता पण वर्ष निघुन गेला तरी आपली निवीदा प्रक्रिया पूर्ण झाली नाही महापालिकाने कळंबोली शहरातील रस्ते कॉक्रीटीकरण केले, पण ते रस्ते खुपच उंच झाले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये येणाऱ्या पावसाळयाबाबत भिती निर्माण झाली आहे.

त्यामुळे महापालिकेने यावर काय उपाययोजना केल्या आहे ते कळंबोली शहरातील नागरिकांना लोकप्रतिनिधी यांना विश्वासात घेऊन यावर मार्ग काढावे. माझ्या माहितीप्रमाणे, सिंग हॉस्पीटल जवळ असणारे पंप हाऊस येथे मागच्या वर्षीपेक्षा तिथे पंप वाढवावे तसेच पावसाळयामध्ये आपली कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी तसेच सतत सतर्क राहतील, अशी टीम असणे गरजेचे आहे. माझ्या पत्राचा विचार करूण यावर मार्ग काढाल, अशी अपेक्षा रविनाथ पाटील यांनी पत्रात व्यक्त केली आहे.

**विविध प्रकारचे चित्रपट महोत्सव ही चित्रपट संस्कृतीतील एक महत्त्वाची गोष्ट आणि त्यानिमित्त चित्रपट संस्कृतीतील काही गोष्टींवर फोकस टाकण्याची संधीही मिळते. चित्रपट व मालिका यातून होत असलेले महाराष्ट्रातील विविध शहरांपासून ते ग्रामीण भागातील दर्शन हादेखील एक महत्त्वाचा विषय.**

**मराठी चित्रपट महोत्सव निमित्ताने**

# पडद्यावरचा महाराष्ट्र

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ आणि पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने २१ ते २४ एप्रिलदरम्यान पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे चित्रपताका महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 'मराठी चित्रपटसृष्टीचे प्रतिनिधित्व करणारी एक झळाळती पताका म्हणजेच 'चित्रपताका' ही संकल्पना या महोत्सवामागे आहे. या चार दिवसांच्या चित्रपट महोत्सवात एकूण ४१ दर्जेदार मराठी चित्रपट दाखवले जाणार आहेत. या चित्रपटांमध्ये पूर्ण लांबीचे सामाजिक, ग्रामीण, ऐतिहासिक, पर्यावरण विषयक, स्त्री जीवना विषयक प्रश्न मांडणारे चित्रपट, बालचित्रपट, विनोदी अशा विविध जॉनरच्या चित्रपटांचा समावेश आहे. मराठी चित्रपटांविषयीचे प्रदर्शनही या महोत्सवात आहे.

थर्ड आय चित्रपट महोत्सव, मुंबईत आयोजित करण्यात आलेला मराठी चित्रपट महोत्सव यातील श्रीकांत प्रभाकर दिग्दर्शित व श्री बैजप्रभा चित्र निर्मित भेरा या चित्रपटाचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील छोट्या गावात झाले आहे. जून २०२०मध्ये कोरोना काळातील ही भावस्पर्शी नि अंतर्मुख करणारी गोष्ट आहे. याचे संपूर्ण चित्रीकरण कुडाळ, निवती समुद्र किनारा इत्यादी ठिकाणी झाले आहे. विशेष उल्लेखनीय गोष्ट हे ग्रामीण वातावरण कथेचा महत्त्वाचा भाग झाले आहे, तर कुडाळ आणि कोकणातील अन्य काही ठिकाणी स्टार प्रवाहवरील कोण होतीस तू, काय झालीस तू या मालिकेचे कथानक घडते. या मालिकेत गिरीजा प्रभू, सुकन्या कुलकर्णी मोने, वैभव मांगले, अमित खेडेकर, अमृता माळवदकर, भाग्यश्री पवार, मंदार जाधव इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. या मालिकेची पहिली झलक कुडाळ तालुक्यातील वालावल येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिरात दशावतारचा प्रयोग आयोजित करण्यात आला असता




त्यात दाखवण्यात आली आणि स्थानिक नागरिकांचा त्याला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. स्थानिक संस्कृतीचा असा सहभाग विशेष उल्लेखनीय गोष्ट. कुडाळ रेल्वेस्थानकावर उतरताच या मालिकेच्या टीमचे अतिशय झालेले उत्फूर्त स्वागत उत्साहवर्धक. हे असे प्रेम आऊटडोअर्स लोकेशन शूटिंगच्या वेळेस मिळते.

चित्रपट व मालिकेतील महाराष्ट्र याच्या फ्लॅशबॅकमध्ये जायचे तर, आपल्याकडे 'सिनेमाचा जन्म'च आपल्या मुंबईत झाला आणि तोदेखिल दादासाहेब फाळके या मराठी माणसामुळे झाला. त्यांनी दादरच्या पूर्वेला मथुरा भवन नावाची इमारत होती, तेथे एक स्टुडिओ उभारुन 'राजा हरिश्चंद्र' (३ मे १९१३ रोजी प्रदर्शित) या आपल्याकडच्या पहिल्या चित्रपटाची निर्मिती केली. (आज जो दादासाहेब फाळके रोड आहे, तेथेच ही इमारत होती) .

सिनेमा निर्मितीची मुहूर्तमेढच मुंबईत झाल्याने सुरुवातीला येथेच चित्रपट निर्मिती होत राहणे स्वाभाविक होते तसेच दादासाहेब फाळके यांची फाळके अ‍ॅन्ड कंपनी ही चित्रपट निर्मिती संस्था नाशिक येथे असल्याने तेथेही काही प्रमाणात चित्रपट निर्मिती झाली. बाबूराव पेंटर यांच्या महाराष्ट्र फिल्म कंपनीने कोल्हापूर येथे चित्रपट निर्मिती सुरू केली. दिग्दर्शक विष्णूपंत दिवेकर यांनी भारत फिल्म कंपनीच्या वतीने 'कृष्णकुमार' या पौराणिक चित्रपटाची पुणे शहरात निर्मिती केली आणि मग तेथेही चित्रपट निर्मितीची संख्या हळूहळू वाढली. मुंबई, पुणे आणि नाशिक ही मूकपटाच्या काळातील चित्रपट निर्मितीची मुख्य केंद्र होती. तेथे आणखी काही निर्माते आणि दिग्दर्शक कार्यरत होत राहिले. १९३१ साली दिग्दर्शक अर्देशीर इराणी यांनी मुंबईत 'आलम आरा' हा पहिला हिंदी बोलपट निर्माण केला, तर १९३२ साली प्रभात फिल्म कंपनीसाठी चित्रपती व्ही. शांताराम यांनी 'अयोध्येचा राजा' हा मराठीतील पहिला बोलपट कोल्हापूर येथे निर्माण केला.

त्या काळात, म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदुस्तानात मुंबई, पुणे, कोल्हापूर, चेन्नई (पूर्वीचे मद्रास), कोलकत्ता (पूर्वीचे कलकत्ता) आणि लाहोर (आता पाकिस्तानमध्ये) ही चित्रपट निर्मितीची मोठी केंद्र होती.

साठच्या दशकात 'सिनेमा बाह्यचित्रीकरण स्थळावर' आला. ते गरजेचेही होते. सुरुवातीला मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया, नरिमन पॉईंट, गिरगाव चौपाटी, वरळी सी फेस, जुहू चौपाटी येथे एखादे गाणे चित्रीत होऊ लागले. मग महाबळेश्वर, पांचगणीला पसंती मिळाली. दुलाल गुहा दिग्दर्शित 'दुश्मन' (१९७२)चे बरेचसे चित्रीकरण नाशिक येथे झाले.

मराठी व हिंदी चित्रपटाने महाराष्ट्रातील अधिकाधिक लहान मोठ्या पर्यटन स्थळांवर, शहरात, गावाखेड्यात शूटिंग सुरु केले आणि त्यात या एकूणच कालावधीत बदलत गेलेला महाराष्ट्र 'सिनेमाच्या पडद्यावर' येत गेला. त्याचा वेग पंचवीस तीस वर्षात खूपच वाढलाय. मुंबईजवळच्या मीरा भाईंदर, वसई, नायगाव असे करता करता एकीकडे सफाळा तर दुसरीकडे घोडबंदर रोडवर लहान मोठे कारखाने बंद पडले. त्याचे रूपांतर शूटिंग स्पॉटमध्ये झाले तसेच अनेक फार्म हाऊस, रिसोर्टसमध्येही चित्रपट, मालिकांचे शूटिंग होऊ लागले, तर मराठी चित्रपटाने सत्तरच्या दशकात अलिबाग तालुक्यातील चौल परिसरात 'यशोदा'चे शूटिंग केले, काही वर्षांनी सासवणे समुद्र किनारावर 'मुंबईचा फौजदार'मधील रवींद्र महाजनी आणि रंजना यांच्यावर हा सागरी किनारा... या गाण्याचे शूटिंग केले. कालांतराने 'क्षणभर विश्रांती' हा संपूर्ण मराठी चित्रपटच अलिबागमध्ये घडताना, तर रेवदंडापर्यंत शूटिंग केले. अगदी माधुरी दीक्षितने भूमिका साकारलेल्या एकमेव मराठी चित्रपटाचे रेवदंडा परिसरात शूटिंग झाले आणि तिच्यासोबत भूमिका साकारत असलेल्या रेशम टिपणीसने आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने मांडवा ते गेट वे ऑफ इंडिया असा ये जा प्रवास केला. मराठी व हिंदी चित्रपटासह मालिका, एखादी जाहिरात, म्युझिक अल्बम यांचेही अलिबागच्या गावागावात सातत्याने शूटिंग असते. चौलमधील रामेश्वर मंदिर आणि त्याची पोखरण यांचा काही दिग्दर्शक अतिशय उत्तम







रितीने उपयोग करुन घेतात. प्रकाश कुंटे दिग्दर्शित 'कलरफुल' या मराठी चित्रपटासाठी सई ताह्मणकर आणि ललित प्रभाकर यांच्यावर येथेच महत्त्वाची दृश्ये चित्रीत केली. अनेक दिग्दर्शक, छायाचित्रणकार, कला दिग्दर्शक यांनी महाराष्ट्रातील अधिकाधिक स्थानांचा असाच थीममध्ये अथवा एकाद्या दृश्यात वापर करून 'जुना आणि बदलता महाराष्ट्र' सिनेमाच्या पडद्यावर आणायला हवा. नुसतेच आपलं, युनिट घेऊन एखाद्या गावाला जायचे आणि तेथील शांतता भंग करायची असे नको. महत्त्वाचे म्हणजे, त्या गावातील स्थानिकानाही युनिटमध्ये शक्य तेथे सामावून घेऊन त्याना रोजगार मिळू देत.

राज्यात विविध ठिकाणी शूटिंगच्या प्रवासात बरेच संदर्भ आहेत. दिग्दर्शक एन. चंद्रा यांनी 'युगंधर'चे बरेचसे शूटिंग मुरूडला केले. दिग्दर्शक राजेश म्हापुस्करने आपण श्रीवर्धनचे आहोत म्हणून आपल्या 'व्हेंटिलेटर' चित्रपटाचा मुहूर्त आणि सुरुवातीचे प्रसंग तेथेच चित्रीत केले. रोहन मापुस्करचा एप्रिल मे ९९ याच श्रीवर्धनमध्ये घडतो. पंचवीस वर्षांपूर्वीच्या ग्रामीण भागातील मामाच्या घरच्या आठवणी ताज्या करतो. अगदी जवळचा विषय.

कोकणात खेड चिपळूणपासून मालवण, सिंधुदुर्गपर्यंत पूर्वीच्या तुलनेत आता शूटिंगचे प्रमाण खूपच वाढलेय. मच्छिंद्र कांबळीच्या विनय आपटे दिग्दर्शित 'करायचं ते दणक्यात'चे बरेचसे शूटिंग मालवणला केले. १९९९चा हा चित्रपट. संदीप सावंत दिग्दर्शित 'श्वास'नंतर (२००३) कोकणात 'शूटिंग करूयात' ही भावना वाढली. 'रात्रीस खेळ चाले' ही अख्खी मालिका कोकणात घडली आणि त्याची बरीच चर्चाही झाली. आशुतोष गोवारीकरने 'खेले हम जी जानसे'चे थीमनुसार रत्नागिरीत शूटिंग केले तेव्हा अभिषेक बच्चन आणि दीपिका पदुकोण हे विमानाने पणजीला जात आणि तेथून रत्नागिरी गाठत. 'काकस्पर्श'चे गुहागरला शूटिंग होताना तो सगळा परिसर पटकथेचाच एक भाग बनले. विहीरीवरील रहाटावरचा प्रिया बापटने साकारलेला प्रसंग अतिशय उत्तम आहेच, त्यात आजूबाजूच्या परिसराचाही प्रभाव दिसतो.

खोपोली (येथील स्नेहबंध वृध्दाश्रमात 'तिन्ही सांजा 'चे शूटिंग झाले), खंडाळा, लोणावळा परिसरातील शूटिंगचे संदर्भ सांगावे तेवढे थोडेच. पुणे जिल्ह्यातील अनेक तालुक्यात शूटिंगचे योग. ८ दोन ७५चे कात्रजमध्ये तर 'शपथ'चे फार पूर्वी बारामतीत शूटिंग झाले. सिंहगडवर 'लपंडाव'चे शूटिंग झाले तसेच 'बघतोस काय मुजरा कर'मध्ये गड किल्ल्याचे अभिमान वाटावा असे दर्शन झाले. जुन्नर परिसरात संतोष मांजरेकर दिग्दर्शित 'लकडाऊन'चे शूटिंग झाले. खडकवासला येथील दादा कोंडके स्टुडिओचे नव्वदच्या दशकात शिवसेनाप्रमुखांच्या हस्ते उदघाटन झाले आणि तेथेही शूटिंगचे सातत्य आहे. भोर तालुक्यात शूटिंगला भरपूर स्कोप. पुणे सातारा महामार्गावरील खेड शिवापूरपासून आतल्या भागात भोरचा ग्रामीण भाग सुरु होतो. भोरचा भव्य राजवाडा (बाजीराव मस्तानी, कट्यार काळजात घुसली, मुंबई पुणे मुंबई २, हे चित्रपट तसेच अहिल्याबाई होळकर, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज इत्यादी ऐतिहासिक मालिकांचे शूटिंग येथलेच), नदीकाठी वसलेल्या बनेश्वरमधील महादेवाचे मंदिर, नीरा देवधर, भाटघरची धरणं, येळवती आणि नीरा नदीमुळे इंगवली गावालगतचा परिसर, इंगवली गावाचे प्रवेशद्वार असे करता करता तेथील स्टुडिओपर्यंत शूटिंग होत असते. 'माहेरची साडी'चे सगळे शूटिंग याच स्टुडिओत झाले. साईबाबा या हिंदी मालिकेचे तेथे दीर्घकाळ शूटिंग आहे. भोर तालुक्यात 'हिरकणी', 'चंद्रमुखी' अशा बहुचर्चित चित्रपटांचे शूटिंग झाले. सातारामध्येही सातारा शहर तसेच भोगाव, शेंदूर जणे, आनंदपूर, म्हसवड, कदमवाडा,




सायगाव, उंब्रज इत्यादी ठिकाणी शूटिंग सुरु असते. सातारातच अलका आठल्येच्या 'आई माझी काळूबाई' या मालिकेचे शूटिंग झाले. सातारा शहरातील शुभम आणि राजलक्ष्मी थिएटरमध्ये 'चल लवकर' या चित्रपटाचे शूटिंग झाले. वाई आपण अनेक चित्रपटात पाहातो. तेथील परखंदी गाव अनेक चित्रपटात दिसले. आशुतोष गोवारीकरने 'स्वदेस'मध्ये हा सगळा परिसर एखाद्या व्यक्तिरेखेप्रमाणे दाखवला. प्रकाश झा तर आपल्या अनेक चित्रपटातील बिहार अथवा उत्तर प्रदेश म्हणून याच परिसरात शूटिंग करतात आणि आम्हा सिनेपत्रकारांना शूटिंग रिपोर्टींगसाठी आमंत्रित करतात. पाचगणी, महाबळेश्वर परिसरात शूटिंग होणे स्वाभाविक आहेच. कोल्हापूरला शूटिंगचे अनेक स्पॉट आहेत. कोल्हापूर चित्रनगरीत महेश कोठारे निर्मित 'दख्खनचा राजा ज्योतीबा' या मालिकेचे शूटिंग झाले. रंकाळा, पन्हाळा, किशा बापूचा मळा येथे बरेच शूटिंग झाले आहे. कराडच्या कडेपूर परिसरात अलका आठल्येने 'अग्निपरीक्षा' या चित्रपटाचे शूटिंग केले. सांगलीतील नरसोबाची वाडी शूटिंग स्पॉट आहे.

उत्तर महाराष्ट्रातही शूटिंगचे सातत्य आहेच. एन. चंद्रा 'प्रतिघात', 'नरसिंह'चे आवर्जून नाशिकमध्ये भरपूर शूटिंग केले तेव्हा त्यांचे म्हणणे होते, नाशिक म्हणजे आपल्या देशातील कोणत्याही शहराचे मिनीऐचर अर्थात छोटी आवृत्ती आहे. नाशिक परिसरात 'सुंदरा मनामध्ये भरली' या मालिकेने ठाणच मारली. 'गोदावरी' या मराठी चित्रपटात हा परिसर पटकथेचाच एक भाग असल्याने तेथे शूटिंग झाले. माधुरी दीक्षितने 'अ‍ॅक्ट्रेस' या वेबसिरिजसाठी नाशिकमध्ये शूटिंग केल्याची स्थानिक वृत्तपत्रात पहिल्या पानावरची बातमी झाली. तात्पर्य, अमूकतमूक गावात शूटिंग झाले हो एवढ्यापुरती ही संस्कृती नाही. जळगावला 'काळशेकर आहेत का?'च्या शूटिंगसाठी भरत जाधव व दीपाली सय्यदने बरेच दिवस मुक्काम केला. शिर्डीत साईबाबांवरचे चित्रपट, मालिका, गाणी यांचे शूटिंग होणे स्वाभाविक आहे. नगर शहर आणि तालुक्यात आता बरेच शूटिंग झालेय. गजेंद्र अहिरेने 'विद्यापीठ'चे सगळे शूटिंग नगरमध्ये केले. तुझं माझं जमेना या मालिकेची सगळी वाटचाल नगरमध्ये आहे. अर्थात, बाह्यचित्रीकरण स्थळी शूटिंगला गेल्यावर पुन्हा बंगल्यातच गोष्ट घडणे उपयोगाचे नाही, तर तो परिसरही यायला हवा. सौभाग्यावती भव या चित्रपटाचे अमरावती, अकोला, परतूर, रेणुकामाता देवस्थान अशा अनेक ठिकाणी शूटिंग झाले. मन मंदिरा, गजर कीर्तनाचा या मालिकेचे राज्यातील अनेक देवस्थळांवर शूटिंग झाले. मिलिंद गुणाजीनेही 'भटकंती' या कार्यक्रमातून राज्यातील अनेक गडकिल्ले, पर्यटन स्थळाची अतिशय उपयुक्त अशी माहिती करून दिली. नागपूरमध्ये फॅमिली नंबर वन या मराठी चित्रपटाचे शूटिंग झाले.

राज्यात अशा पद्धतीने अनेक ठिकाणी शूटिंगचे योग आले अथवा येताहेत. आणखी काही नावे सांगायची तर, धामनेर, सज्जनगड, कास माऊली, निढळ, चाफळ, अंबेजोगाई, फलटणचा निंबाळकर वाडा, तसेच एकीकडे मलकापूर, तर दुसरीकडे खारेपाटण, मावस, मावळंगे, गोठणे, मसूरे अशी बरीच नावे सांगता येतील.

अशा पद्धतीने दूरदूरवर शूटिंगचे प्रमाण वाढण्याच्या कारणात एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, उत्तम वाहतूक व्यवस्था आणि मोबाईल कनेक्टीव्ही हेदेखील आहे. त्याच वेळेस राज्यातील विविध भागातून लेखक, निर्माते, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ आणि कामगार मनोरंजन क्षेत्रात आले. ते होणे गरजेचे असते. तरच त्या क्षेत्रात नवीन कल्पना येत राहतात. वैभव तत्ववादी नागपूरवरून आला तर सई ताह्मणकर सांगलीवरून आली. रसिका सुनील मुळची अकोल्याची, मकरंद अनासपुरे औरंगाबादचा तर भारत गणेशपुरे अमरावतीचा. अलका दाते नाशिकची तर वैभव मांगले कोकणातून



आला. अशी बरीच उदाहरणे आहेत. अर्थात, आपली गुणवत्ता आणि स्वप्ने घेत असे अनेकजण मुंबईत येतात, एकीकडे राहण्याची समस्या असते तर दुसरीकडे एकेका संधीसाठीचा संघर्ष असतो आणि ज्याचा त्यालाच करायचा असतो. याचीच दुसरी बाजू अशी राज्यातील विविध भागातून येतांना हे आपल्या स्थानिक भाषेची ढ्वत अथवा शैली घेऊन येतात आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे मकरंद अनासपुरे असो अथवा भारत गणेशपुरे असो त्यांच्या मूळ भाषेसह यशस्वी झाले. अर्थात, आपल्या मेहनतीने त्यांनी आपले स्थान निर्माण केले.

अशा पद्धतीने मनोरंजन क्षेत्रात चहुबाजूने महाराष्ट्रातील स्थळे, माणसे, भाषा आणि सर्व प्रकारची संस्कृती यांची छान सरमिसळ झाली आहे. एकाद्या दिवशी चित्रपट अथवा मालिकेच्या सेटवर कोणी वैदर्भीय सावजी मटणाचा डबा आणतो तर कोणी नागपूरची संत्रा बर्फी, कोणी नाशिकचा चिवडा, अलिबागचा पांढरा कांदा आणतो मग इतरांनाही त्याची चव चाखता येते.

रूपेरी पडद्यावरचा महाराष्ट्राचा एकूणच प्रवास खूपच मोठा विषय आहे. मोठ्या पडद्यावरुन तो छोट्या पडद्यावर असा दोन्हीकडे सुरू आहे. लेखात दिलेली उदाहरणे हा फक्त ट्रेलर आहे. यासह अनेक चित्रपट, मालिका, जाहिराती वगैरेंचे राज्यातील विविध ठिकाणी शूटिंग होत होत हा माहितीपूर्ण व रंजक प्रवास सुरू आहे.

मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या चित्रपताका महोत्सवाच्या निमित्ताने हा एक वेगळा आणि चित्रपटसृष्टी व सामान्य नागरिक यांच्या अगदी जवळच्या गोष्टीवरील फोकस. आपल्याकडील चित्रपट आपल्या प्रेक्षकांना जास्त जवळचा व आपलासा म्हणून ही वेगळी दखल.

# प्रख्यात बासरीवादक पन्नालाल घोष

पन्नालाल घोष हे एक प्रख्यात बासरीवादक होते. त्यांचे पूर्ण नाव अमल ज्योती घोष असे होते. त्यांनी बासरी या वाद्यात अनेक सुधारणा केल्या तसेच बासरी वादन हे भारतीय गायकीच्या जवळ नेऊन ठेवले. पन्नालाल घोष यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयी जाणून घेऊया...

पन्नालाल घोष यांचा जन्म २४ जुलै १९११ रोजी बारिसाल (बांगलादेश) येथे झाला. पन्नालाल घोष यांचे वडील अक्षयकुमार घोष हे उत्तम सतारवादक होते. वयाच्या चौदाव्या वर्षीच पन्नालाल बासरीकडे आकृष्ट झाले. पुढे १९३४मध्ये त्यांनी मास्टर खुशी महम्मद या संगीतकाराचे शिष्यत्व पत्करले. 'सराईकेला नृत्यमंडळी'त ते काही काळ संगीत दिग्दर्शक होते. 'सराईकेला नृत्यमंडळी'बरोबर १९३८मध्ये पन्नालाल घोष यांना युरोपचा प्रवास घडला. गिरिजा शंकर



चक्रवर्ती यांच्याकडे १९३९मध्ये आणि पुढे १९४७च्या सुमारास उस्ताद अल्लाउद्दीन खाँ यांच्याकडे पन्नालाल घोष यांनी संगीताचे अधिक शिक्षण घेतले.

पन्नालाल घोष हे चित्रपटक्षेत्रात १९४० ते १९४४ या काळात संगीत दिग्दर्शक म्हणून होते व पुढेही तेथेच १९५६पर्यंत बासरीवादक होते. या काळात त्यांनी बासरीवादनाचे स्वतंत्र कार्यक्रमही केले. आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रात १९५६पासून पन्नालाल घोष ते वाद्यवृंद निर्देशक होते. त्यांनी बॉम्बे टॉकीजमध्ये संगीत दिग्दर्शकाचे आणि बासरीवादनाचे काम केले. पन्नालाल घोष यांनी बासरीत आमूलाग्र परिवर्तन घडविले. बासरीची लांबी ४०–४२ इंचांपर्यंत वाढविली तसेच बासरीवर बोटे ठेवण्याचे वेगळे तंत्र विकसित केले. पंडितजींनी अनेक नवीन रागांची निर्मिती केली त्यातील राग जयंत हा एक महत्त्वाचा राग आहे.


पन्नालाल घोष हे बासरीवादनाच्या क्षेत्रातील एक युगप्रवर्तक होत. वेणुवादनाला भारतात दीर्घकालीन इतिहास असला तरी बासरीवादनाला एक स्वतंत्र व स्वायत्त दर्जा मिळवून देण्यात पन्नालाल घोष यांचा फार मोठा वाटा होता.

घोष यांच्या शिष्यगणांमध्ये हरिप्रसाद चौधरी, देवेंद्र मुर्डेश्वर, बेडा देसाई इ. प्रसिद्ध बासरीवादकांचा समावेश होतो. अशा या श्रेष्ठ बासरीवादकाचे २० एप्रिल १९६० रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

# आद्य इतिहास संशोधक चिं.वि. वैद्य

चिंतामण विनायक वैद्य हे संस्कृत भाषेतील विद्वान होत. ते एक थोर ज्ञानोपासक, महाभारत–रामायणाचे संशोधक, मीमांसक व चतुरस्र ग्रंथकार होते. संस्कृत भाषेच्या व्यासंगामुळे त्यांनी रामायण–महाभारतासारख्या पौराणिक इतिहासाच्या अनेक अपरिचित भागांवर प्रकाश टाकला. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

१८ ऑक्टोबर १८६१मध्ये कल्याणमध्ये त्यांचा जन्म झाला. चिंतामण विनायक वैद्य हे संस्कृत भाषेतील विद्वान होत. ते एक थोर ज्ञानोपासक, महाभारत–रामायणाचे संशोधक, मीमांसक व चतुरस्र ग्रंथकार होते. संस्कृत भाषेच्या व्यासंगामुळे त्यांनी रामायण–महाभारतासारख्या पौराणिक इतिहासाच्या अनेक अपरिचित भागांवर प्रकाश टाकला. आज त्यांची जयंती. १८ ऑक्टोबर १८६१ रोजी कल्याणमध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील विनायकराव हे वकील होते. ते कल्याणमध्येच वकिली करत. कल्याण तसेच मुंबईच्या एल्फिन्स्टन स्कूल व एल्फिन्स्टन कॉलेजात चिंतामणरावांचे शिक्षण पार पडले. १८८२मध्ये एमएची पदवी मिळवल्यानंतर १८८४मध्ये त्यांनी एलएलबीची पदवी संपादित केली. त्यानंतर कोल्हापूरमधील शिरोळ येथे त्यांनी काही काळ मुनसफ म्हणून नोकरी केली. त्यानंतर ठाण्याच्या कोर्टात वकील म्हणून त्यांनी काम केले. त्यानंतर उज्जैन येथे न्यायाधीश पदावर ते रुजू झाले.



१८९५ ते १९०४ या कालावधीत त्यांनी ग्वाल्हेरच्या सरन्यायाधीशपदाची जबाबदारी पार पाडली. १९०५मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी लोकमान्य टिळकांसोबत राष्ट्रीय कार्यात स्वतःला वाहून घेतले. कोलकाता, सुरत आदी ठिकाणी अधिवेशनांना ते लोकमान्य टिळकांसोबत गेले.

टिळकांच्या निधनानंतर वैद्य यांनी महात्मा गांधीजींसोबत कार्य करण्यास सुरुवात केली. त्यांनी निष्ठेने आणि आस्थेने राष्ट्रीय शिक्षणाचे कार्य केले. काही कालावधीनंतर चिंतामणरावांनी राजकारण सोडले. १८८९ ते १९३४ या कालावधीत वैद्यांनी विपुल लेखन केले. केसरी, विविधज्ञानविस्तार, इंदुप्रकाश, नेटिव्ह ओपिनियन आदी नियतकालिकांमधून त्यांचे स्फुटलेखन प्रसिद्ध झाले. त्यांचे एकूण २९ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. यामध्ये नऊ इंग्रजी आणि २० मराठी ग्रंथांचा समावेश आहे.

चिं.वि. वैद्यांच्या 'महाभारत ए क्रिटिसिझम' या इंग्रजी ग्रंथावर लोकमान्य टिळकांनी केसरीतून सलग आठ अग्रलेख लिहिले. याद्वारे चिं.वि. वैद्य यांच्या ग्रंथांची मौलिकता स्पष्ट होते.

१९०८मध्ये पुणे येथे भरलेल्या सहाव्या मराठी साहित्य (ग्रंथकार) संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. २० एप्रिल १९३८ रोजी त्यांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

# माणगावात अमृत २.० योजनेंतर्गत विविध कामे

**माणगाव : बातमीदार**

राज्य व केंद्र शासनाच्या अमृत २.० महा अभियान योजनेंतर्गत माणगांव उतेखोल जलशुद्धीकरण केंद्रात २.५ लाख लिटर पाणी क्षमतेचा एका एमबीआरचे (जलकुंभ) व १ लाख ६० हजार क्षमतेच्या एका टाकीचे काम वेगाने सुरू असुन नाणोरे (पूर्व), भादाव, येथे देखील दोन टाक्या असे एकुण चार जलकुंभ पाणीपुरवठा योजनेच्या नवीन बांधकामास नोव्हेंबर २०२४ दिपावली नंतर वेगाने सुरुवात झाली आहे.



महाड पोलादपूर व माणगांवचे तत्कालीन आमदार व विद्यमान कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या पाठपुराव्यामुळे ही योजना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळात मंजूर झाली साधारणतहा ५४ कोटी रुपयांची जिएसटी समावेष्टीत अंदाजीत रक्कम यासाठी खर्च होणार असल्याची माहिती नगरपंचायत कडून सांगण्यात येत आहे.

माणगाव ग्रामपंचायतचे माणगाव नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाल्यानंतर नगर पंचायतीमध्ये माणगांव, भादाव, खांदाड, उतेखोल, नाणोरे या गावांचा समावेश आहे. माणगांव नगर पंचायत हद्दीत कार्यान्वित असलेली नळपाणी पुरवठा योजना जुनी झाली असून, सदर योजनेतून नगर पंचायत हद्दीत सद्यस्थितीत पाणी पुरवठा करण्यात येत आहे. अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा योजनेत वेळो-वेळी बदल करण्यात आले आहेत.

आजपर्यंत ग्रामीण भागातील निकषानुसार प्रति माणसी प्रति दिन ४० ते ५५ लिटर प्रमाणेच शहरामध्ये पाणी पुरवठा होत आहे. नगर पंचायतीमध्ये रूपांतर झाल्यानंतर नागरी क्षेत्रा मध्ये शासनाचे पाणीपुरवठा वितरण निकषानुसार प्रति माणसी प्रति दिन १३५ लिटर पाणी पुरवठा होणे गरजेचे आहे. माणगांव शहराची सन २०११च्या जनगणनेनुसार लोकसंख्या १८,७४० इतकी असून, मागील काही वर्षात शहराचे मोठ्या प्रमाणात नागरीकरण झालेले आहे.

शहरात वाढलेल्या नागरीवस्तींना पाणी पुरवठा करणे नगर पंचायतीचे कर्तव्य आहे. शहरात पाणी पुरवठा अस्तित्वातील वितरण व्यवस्था अपुरी पडत असून अनेक विभागात पाणीपुरवठ्याच्या तक्रारी होत आहेत. काही विभागामध्ये उंच जलकुंभ घेवून वितरण व्यवस्था करणे गरजेचे होते. सद्या शहराचे काही भागामध्ये नदीवरती पंप बसवून विना शुध्दीकरण पाणी पुरवठा देखील होत असल्याने, तेथील नागरीकांना शुध्द पाणी पोहचत नाही. या सर्व बाबींचा विचार करता व उतेखोल येथील कार्यान्वित पाणीपुरवठा योजनेतून होणारा पाणीपुरवठा लक्षात घेता, नगरपंचायत हद्दीतील माणगांव, खांदाड, मुंबई-गोवा हायवे महामार्गाचा नाणोरे गोद नदीपर्यंतचा परिसर (पूर्व भाग) व उतेखोल, भादाव, नाणोरे (पश्चिम भाग) अशी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात येत असून शहरातील पाणी पुरवठ्याबाबत भविष्यातील समस्या दूर होऊन शहरामध्ये नियमित स्वरूपात शुध्द पाणीपुरवठा करणे शक्य होऊन परिस्थितीमध्ये सुधारणा अपेक्षित असल्याने माणगांव शहरातील जुनी पाईप लाईनदेखील बदलून नव्याने एसडिपी लाईनचे काम पुणे कोथरूड येथील एस.के इंटर प्रायझेस मार्फत हे काम वेगाने सुरु करण्यात आले असून, जवळपास सुधारीत नविन जलकुंभ तसेच जलशुद्धी केंद्रातील फिल्टरेशन प्लाण्ट डागडुजी व रंगरंगोटीच्या कामालादेखील सुरुवात झाल्याने माणगांव शहरातील पाणी पुरवठा अधुनमधुन या कामांचे कारणास्तव विस्कळीत होणार असल्याने नागरिकांकडून सहकार्याची अपेक्षा आहे.

पाईप लाईन टाकण्यासाठी शहरात जागोजाग खोदकामे सुरु आहेत. तसेच माणगांव खांदाड येथे संपूर्ण नवीन पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात येणार असुन जॅकवेल, फिल्टरेशन प्लाण्ट एक एमबीआर व तीन टाक्या(जलकुंभ) नव्याने उभारल्या जात आहेत. हे काम पूर्ण झाल्या नंतर भुयारी गटार योजनेचा प्रकल्प अहवाल मंजूर असून ही योजना देखील राबविणे प्रस्तावित आहे. या योजनेत अनुदान मंजूर झाल्याने पाणी पुरवठा योजनेसाठी लागणारी जागा नगर पंचायतीने उपलब्ध करुन दिली, आणखी गरज भासल्यास आवश्यकतेनुसार जागा उपलब्ध करून देण्यात येईल, परंतु काही भागात यासाठी नागरिकांमधुन हरकती आल्याने या कामाला विलंब होत असल्याची माहीतीदेखील मिळत आहे.

### *शासन निर्णयानुसार प्रकल्पाची अंमलबजावणी*

***माणगाव नगर पंचायतीची आर्थिक स्थिती पाहता सदर योजनेकरिता तसेच योजनेचा स्व: हिस्सा भरणे कामीसुध्दा नगर पंचायतीकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे १०० टक्के अनुदान मागणी साठी माणगांव नगर पंचायतीचे नवीन पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेत आला तो मंजुर झाला, अमृत २.० महाअभियान अंतर्गत शासन परिपत्रक, अटी, शर्ती व सुधारणा करणे व सदर योजनेबाबत वेळो वेळी निर्गमित होणारे शासन निर्णयांनुसार सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.***

# शेतकरीवर्गाने आंबा, काजू फळझाडांचा ई-पीक विमा उतरवावा -सुनील निंबाळकर

**खोपोली : प्रतिनिधी**

आंबा व काजु हे फळपिक निसर्गावर अवलंबून असल्यामुळे निसर्गाच्या लहरीपणामुळे हे पिक धोक्यात येते. यामुळे शेतकरीवर्गांस मोठ्या नुकसान सहन करावे लागते, मात्र या पीक पाहणी योजने अंतर्गत सहभाग नोंदविलेल्या शेतकऱ्यांना पीक संरक्षित रक्कम मिळत असते.

ज्या शेतकऱ्यांनी आंबिया बहार सन २०२४-२५ मध्ये फळपिक विमा योजनेत सहभाग घेतलेला आहे. अशा शेतकऱ्यांनी फळपिक पीक पाहणी डिजीटल क्रॉप सर्व्हे मोबाईल पद्वारे २५ एप्रिल पर्यंत पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी, खालापूर सुनील निंबाळकर यांनी केले आहे



ही योजना १२ जून २०२४ रोजी शासन निर्णयामध्ये महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येत आहे रायगड जिल्हामध्ये आंबिया बहार सन २०२४-२५ कुरिता युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी मार्फत आंबा व काजु या फळपिकांसाठी ही योजना राबविण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांना ई- पीक पाहणी करणे बंधनकारक

विमा संरक्षित क्षेत्राची ई-पीक पाहणी २५ एप्रिल पर्यंत पूर्ण करुन घ्यावी अन्यथा योजनेच्या निकषानुसार ई -पीक पाहणी नोंद नसलेले सर्व विमा अर्ज कंपनीमार्फत रद्द करण्यात येतील व फळपिक विमाचा लाभ मिळणार नाही. अशी माहिती तालुका कृषी अधिकारी, खालापूर सुनिल निंबाळकर यांनी दिली तसेच त्यांनी सर्व विमाधारक शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करणेबाबत आवाहन केले आहे.

# रोह्यात आजपासून कीर्तनाचा गजर

**रोहे : प्रतिनिधी**

वरदा सुनील तटकरे यांच्या ६१व्या वाढदिवसाचे औचित्य साधून वरदायी कीर्तन अमृत हा किर्तनरुपी गजर २० एप्रिल तर २२ एप्रिल या कालावधीत कुंडलिका नदी संवर्धन पार्किंग मैदान रोहा येथे होणार आहे.

२० एप्रिलपासून सुरू होणाऱ्या वरदायी कीर्तन अमृत या कार्यक्रमात सायंकाळी ५ ते ६.३० हरिपाठ रोहा तालुका वारकरी संप्रदाय, सायंकाळी ७ ते ९ हरिकीर्तन, रात्री ९.३० वाजता महाप्रसाद. २० एप्रिल रोजी ह.भ.प. बाळकृष्ण दादा वसंत गडकर महाराज (सातारा) यांचे कीर्तन, २१ एप्रिल रोजी ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील (बुलढाणा) यांचे कीर्तन, २२ एप्रिल रोजी ह.भ.प. सौ.कांचन माऊली जगताप (नाशिक) यांचे कीर्तन, २० एप्रिलला गायनचार्य ह.भ.प. कैलास महाराज पवार, २१ एप्रिल ला गायनचार्य ह.भ.प.नारायण महाराज खिल्लारी, २० एप्रिल ला मृदुंग ह.भ.प.कृष्ण महाराज भोरकडे, २१ एप्रिलला मृदुंग ह.भ.प. विकास महाराज वेलूकर आदी असणार आहेत.

या संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजक रोहा तालुका वारकरी संप्रदाय असून संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी केले आहे.

# प्रशांत कदम आदर्श ग्रामपंचायत अधिकारी

## उत्तम प्रशासकीय कामाबद्दल सरकारकडून निवड

**चौक : प्रतिनिधी**

आदर्श ग्राम पंचायत अधिकारी म्हणून ग्रुप ग्रामपंचायत तांबाटीचे ग्राम पंचायत अधिकारी प्रशांत कदम यांची राज्य सरकारने निवड केली असून ग्रामविकास सचिव महाराष्ट्र राज्य यांनी पत्र देऊन अभिनंदन केले आहे, त्यामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सन २०२२/२३ व सन २०२३/२४ या कालावधीत ग्राम पंचायत कामकाज अतिशय उत्कृष्ट कामगिरी केलेल्या ग्राम पंचायत अधिकारी यांची निवड राज्य स्थरावर राज्य सरकारने केली आहे. पूर्ण जिल्ह्यातून एकाच अधिकाऱ्याची निवड केली जाते,रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी ग्राम पंचायत अधिकारी प्रशांत कदम यांचे कामकाज अभिनंदनीय आहे, असा शेरा मिळाला आहे. यशवंत ग्राम अभियान यशस्वी करण्यासाठी प्रशांत कदम यांचे विशेष योगदान आहे.



माझी वसुंधरा अभियान ४.० त्यांनी कोकण विभागातून प्रथम क्रमांक मिळवला आहे, माझी वसुंधरा अभियान ५.० मध्य त्यांचे नामांकन अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या काळात अनेक योजना राबविताना निसर्गाचा होणारा ऱ्हास थांबविण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली आहे. त्याचेच फलित म्हणून माझी वसुंधरा अभियान अंतर्गत त्यांची रत्नागिरी येथील कार्यशाळेत निवड झाली होती. त्यांच्या कामाचे मूल्यांकन पाहता राज्य सरकारने त्यांना राज्यस्तरीय आदर्श ग्राम पंचायत अधिकारी म्हणून निवड केल्याचे १५ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णय पत्रात उल्लेख झाला आहे. ही निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव

# रामदास काईनकर यांचा सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ रायगड आणि पनवेल तालुका प्रथम वर्धापन दिनाचे औचित्य साधून सामाजिक कार्यकर्ते रामदास काईनकर यांचा सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ रायगड जिल्हा यांच्या वतीने आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पनवेल तालुका यांच्या प्रथम वर्धापन दिना निमित्ताने समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी केलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, अपघातग्रस्त यांना मदत, वृक्ष लागवड, वृक्ष जोपासणे, वैद्यकीय मदत, पर्यावरण संतुलन, प्लास्टिक मुक्ती, आर्थिक मदत, कोरोना काळात केलेली मदत व समाज हितासाठी लढा देणारे यांचा सन्मान आमदार प्रशांत ठाकूर, मनश्री पाठक, अभिनेत्री हेमांगी राव, अभिनेत्री विद्या ठाकूर, मराठी चित्रपट दिग्दर्शक सैयद अहमद, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सरचिटणीस दीपक आरोटे, पनवेल येथील सुप्रसिद्ध डॉक्टर गुणे, उद्योगपती दीपक पाटील यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.



खालापूर तालुक्यातील वावंढळवाडी गावचे रामदास काईनकर यांच्या सामाजिक कार्याची पत्रकार संघाकडून दखल घेण्यात आली. रामदास काईनकर हे अपघातग्रस्त यांना मदत करणारे, वृक्ष लागवड, वृक्ष जोपासणे करणे, आज पर्यंत पाचशे पेक्षा जास्त झाडांची जोपासना केली आहे. पशु पक्षी यांच्यावरदेखील उपचार करणे, त्यांना अन्न आणि पाणी व औषध उपचार करणे, गरजूंना आवश्यक मदत करणे, धार्मिक कार्यक्रम आयोजित करणे, त्यात सहभागी होणे, रामदास काईनकर यांचा उल्लेख पशु पक्षी मित्र, पर्यावरण प्रेमी म्हणून ते परिसरात परिचित आहेत.

# लोहोप येथे गतिरोधक बसविण्याची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सावरोली खारपाडा हा रस्ता औद्योगिक करणांसाठी ओळखले जात असले तरीसुद्धा या मार्गावर, अनेक गावे या रस्त्यालगत आहेत. या ठिकाणी गतिरोधक बसविणेबाबत विनंती सामाजिक कार्यकर्ते अतुल मालकर यांनी केली होती. यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण यांनी या संदर्भात वरिष्ठांकडे पत्र व्यवहार केल्याचे समजते.

लोहोप हा नाका असून या ठिकाणी दुकाने हॉस्पिटल शाळा, तलाठी कार्यालय असल्यामुळे येथे नागरिकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात पहावयांस मिळत असते. यामुळे भविष्यात कोणताही मोठे संकट निर्माण होण्याअगोदर या ठिकाणी लवकरात -लवकर गतिरोधक बसवावे, अशी मागणी या मार्गावरून प्रवास करणारे कामगार, शाळकरी मुले, प्रवासीवर्ग करीत आहे.



# रोह्यात दि आर्ट ऑफ लिव्हिंगचे आनंद अनुभूती शिबिर यशस्वी

**रोहे : प्रतिनिधी**

सुरेश मगर यांची ए.ओ. एल.महाराष्ट्र अॅपेक्स मेंबर पदी निवड झाल्याबद्दल श्री हनुमंत शिंदे यांच्या दिव्य सानिध्यात अशोक महामुनी, अनंत थोरात, तलवार दीदी, सुप्रिया कुंभार, निळकंठ कदम व रोहा टीचर टीमच्या वतीने जिल्हा परिषद शासकीय विश्रामगृह रोहा येथे १५ ते २० एप्रिल दरम्यान दि आर्ट ऑफ लिव्हिंगचे आनंद अनुभूती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात तणमुक्त शांत मन, आत्मविश्वासात वाढ, नकारात्मक पासून मुक्ती, प्रभावी निर्णय क्षमता, निरोगी शरीर, रोगावर नियंत्रण, मनाची एकाग्रता वाढवण्यासाठी उपस्थित शिबिरात सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थीकडून योगा, प्राणायाम, ध्यान व ज्ञान आणि श्वसनावर आधारित जगप्रसिद्ध सुदर्शन क्रिया घेण्यात आले.

या वेळी उपस्थित गुरुवर्य यांच्या सानिध्यात सामूहिक चर्चा, समाज ज्ञान प्रबोधन व गुरुवर्यांच्या सानिध्यात सत्संग ही करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने भजने घेण्यात आले. या शिबिरात रोहा, नागोठणे, तळा व माणगाव येथील प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आनंद अनुभूती शिबिराचे आयोजन करण्याचे या वेळी उपस्थितांनी सांगितले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी सुरेश मगर, ज्ञानदेव पवार, संदीप सावंत, संदीप पवार, अनुप तलवार, सचिन कदम, अनंत थिटे, शशिकांत कडू, चैतन्य कुलकर्णी, पप्पू मोहिते सर, गणेश खरीवले, विकास खांडेकर, संतोष भोईर आदींसह अन्य साधकांनी परिश्रम घेतले.



# कुत्र्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या घुबडाला जीवदान

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पालीमध्ये कुत्र्याच्या हल्ल्यात गुरुवारी एक घुबड जखमी झाले होते. या घुबडाला स्थानिक वन्यजीव रक्षक व सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेने जिवदान दिले. या घुबडाला जास्त दुखापत झाल्याने रेस्क्यू टीमने त्याला पुढील उपचारासाठी पुण्याला नेले आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, पालीतील डॉ. संजय जाधव यांच्या दवाखान्या समोरील बारदानवाले यांच्या येथील विहिरीजवळ हे जखमी घुबड पडले होते. याबाबत प्रकाश वरंडे यांनी वन्यजीव रक्षक अमित निंबाळकर यांना माहिती दिली. अमित निंबाळकर यांनी वन्यजीव रक्षक शंतनू लिमये यांच्याकडे जखमी घुबड आणून दिले. शंतनू यांनी त्याच्यावर प्रथमोपचार करून पालीतील वनविभागाला कळवले, पण घुबडाला कुत्र्याने अनेक ठिकाणी चावल्यामुळे त्याला उडता येत नव्हते. त्यामुळे कोलाडच्या सह्याद्री वन्यजीव रक्षक सामाजिक संस्थेमार्फत रेस्क्यू संस्थेकडे उपचारासाठी पाठवण्यात आले आहे.

सुधागडामध्ये कुठेही जखमी अवस्थेतील प्राणी, पक्षी व वन्यजीव प्राणी आढळल्यास आमच्याशी संपर्क साधा, असे आवाहन वन्यजीव रक्षक शंतनू लिमये यांनी केले.

# दिशा सांस्कृतिक ग्रुपतर्फे पोलादपूरमध्ये नृत्य स्पर्धा



**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील दिशा सांस्कृतिक ग्रुपच्या वतीने शुक्रवारी सायंकाळी फक्त महिलांसाठी नृत्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले असता महिलांच्या भरगच्च उपस्थितीत महिला स्पर्धकांनी केलेल्या सादरीकरणावेळी महिलांनीच टाळ्या, शिट्या व चित्कारांनी कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृह अक्षरश: डोक्यावर घेतले.

पोलादपूर शहरातील दिशा सांस्कृतिक ग्रुपच्या अध्यक्ष संगिता संतोष मोरे यांच्या नेतृत्वाखाली यंदाच्या फक्त महिलांसाठीच्या नृत्यस्पर्धेवेळी नगराध्यक्षा शिल्पा दरेकर, भावी नगराध्यक्षा स्नेहा मेहता, परिक्षिका वैशाली मिंडे आणि बिशा पोशिलकर आदी उपस्थित होत्या. या वेळी अपर्णा भागवत आणि अध्यक्षा संगिता मोरे यांनी मान्यवर महिलांचा स्वागतसत्कार केला.

या वेळी नगरसेविका श्रावणी शहा, अंकिता जांभळेकर, माजी नगराध्यक्षा अश्विनी गांधी, साहित्यिका अरूणा भागवत, माजी प्रभारी पंचायत समिती उपसभापती कांचन बुटाला तसेच अनेक मान्यवर महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर यांना दरवर्षी प्रसिध्दीसहकार्यासाठी सन्मानित करण्यात आले. या वेळी नगराध्यक्षा शिल्पा दरेकर यांनी सर्व स्पर्धक तसेच आयोजक दिशा सांस्कृतिक ग्रुपला शुभेच्छा दिल्या.

परिक्षिका वैशाली मिंडे यांनीही शास्त्रीय नृत्यप्रकार सादर करून प्रेक्षकांच्या टाळ्या मिळविल्या. सुवर्णा सुकाळे यांनीही विडंबनकाव्य सादर केले. शेवटी महाराष्ट्राची लोकधारा सादर करणाऱ्या ज्योती दाभेकर-विनिता पार्टे विजेत्या ठरल्या तर लावणी मिक्स सादर करणाऱ्या रूचिता दुदूस्कर आणि समिता दुदुस्कर उपविजेत्या ठरल्या.

तृतीय क्रमांकाच्या मानकरी तृप्ती सुकाळे-श्रेया सुकाळे ठरल्या तर उत्तेजनार्थ पारितोषिक समृध्दी तांबे आणि यादवी सुतार यांच्या लल्लाटी भंडार गाण्यावरील नृत्याला देण्यात आले.


**CHANGE OF PRACTICING ADDRESS**

Name Dr. Monarani Chaurasia
State* Reg No = I-20173-A1
Teacher's code = AYRB01475

I am currently practicing at Mandsaur Institute of Ayurvedic Education and Research,PO Mandsaur, Pin-458001, Madhya Pradesh,since 18 Feb 2025


### जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव सावित्रीबाई फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नवीन पनवेल, ता. पनवेल, जि.रायगड., असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. २१/०४/२०२५ ते २५/०४/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. २८/०४/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि.३०/०४/२०२५ ते १४/०५/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक २५/०५/२०२५ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सुरेखा पाटील)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

# डीपीएस फ्लेमिंगो तलाव सुरक्षित

## राज्य सरकारने संवर्धन राखीव क्षेत्र केल्याने पर्यावरणप्रेमी आनंदित

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाने नवी मुंबईतील नेरुळ येथील ३० एकरच्या डीपीएस फ्लेमिंगो तलावाला संवर्धन राखीव म्हणून घोषित करण्याच्या अधिकृत शिफारसीला मान्यता दिली. या निर्णयाने पर्यावरणप्रेमींनी आनंद व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वनविभागाचा आढावा घेतला. या वेळी वनमंत्री गणेश नाईक यांनी डीपीएस तलावाचे महत्त्व व फ्लेमिंगो संवर्धनाचे महत्त्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडले. अखेर फडणवीस यांनी हा तलाव संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून घोषित केले.



ठाणे ग्रीक फ्लेमिंगो अभयारण्याच्या उपग्रह पाणथळ परिसंस्थेचा भाग असलेला हा पहिला पाणथळ प्रदेश आहे. जी संवर्धन मालमत्ता म्हणून संरक्षित केला गेला आहे. दरम्यान, टीसीएफएसमधील फ्लेमिंगो पक्षी उपग्रह पाणथळ प्रदेशात उडतात. वनमंत्री नाईक यांनी सांगितले की हा तलाव फ्लेमिंगोंसाठी एक महत्त्वाचे स्थान म्हणून ओळखले जाते. शहराच्या जैवविविधतेच्या हितासाठी संवेदनशील क्षेत्र म्हणून त्याचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे. नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी.एन. कुमार यांनी यापूर्वीच नाईक यांच्याकडे तलावाच्या संवर्धनासाठी उच्चस्तरीय सरकारी समितीची शिफारस केली होती. नाईक यांनी वन विभागाच्या प्रधान सचिवांना लिहिलेल्या पत्रावर तात्काळ लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश दिले होते. याबाबत अनेक आंदोलनेदेखील झाली होती. फ्लेमिंगो संवर्धन क्षेत्र वाचले पाहिजे यातही नवी मुंबईकरांनी अनेक मोहिमा राबविल्या होत्या.

खुद्द नाईक यांनी या स्थळाची पाहणी करीत सिडकोच्या अधिकाऱ्यांनादेखील झापले होते. या तलावातील पाण्याचा प्रवाह बंद करणाऱ्यांना कडक इशारादेखील दिला होता.

नॅटकनेक्ट फाऊंडेशन, एन्व्हायर्नमेंट प्रिझर्वेशन सोसायटी, सेव्ह फ्लेमिंगोज अ‍ॅन्ड मॅंग्रोव्हज फोरम, खारघर हिल अ‍ॅन्ड वेटलॅण्ड ग्रुप या पर्यावरण संस्थांनी सातत्याने आंदोलने केली आहेत. त्यामुळे गेल्या वर्षी जुलैमध्ये वन विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने केलेला स्थळ पाहणी अहवाल शासनाला सादर केला आहे. खाडीमार्गाने येणारा पाण्याचा प्रवाह कोणत्याही परस्थितीत रोखता येणार नाही, असे या अहवाल नमूद केले होते.

एनएमईपीएसचे संदीप सरीन म्हणाले की, संवर्धन राखीव जागेच्या प्रस्तावाला मान्यता देणे हा सर्व पर्यावरणप्रेमींचा सामूहिक विजय आहे.

### मंत्रीमहोदयांची तलावाला भेट

*शेजारच्या प्रवासी जल वाहतूक टर्मिनलला जाण्यासाठी रस्ता बांधल्यामुळे भरती-ओहोटीचे पाणी अडवण्यात आल्यानंतर पाण्याचा साठा सुकला तेव्हा डीपीएस तलावाभोवती १७ फ्लेमिंगो मृत्युमुखी पडले होते. वनमंत्री गणेश नाईक यांनी आमदार असताना यापूर्वी तलावाला भेट दिली होती. त्याची भयानक स्थिती लक्षात घेतली होती, त्यांनी दोन इनलेट उघडण्याचे आदेश दिले आणि नवी मुंबई महानगरपालिकेला भरती-ओहोटीच्या पाण्याचा योग्य प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी पाईप खाली करण्यास सांगितले होते.*

### शेवाळ होतेय स्वच्छ

*साचलेल्या पाण्यामुळे तलावात भरपूर शेवाळ साचले होते, परंतु आता जवळजवळ ६० टक्के कचरा साफ झाला आहे, असे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. नॅटकनेक्ट, नवी मुंबई पर्यावरण संवर्धन सोसायटी, सेव्ह फ्लेमिंगोज अँड वेटलँड्स फोरम आणि खारघर वेटलँड्स अँड हिल्स फोरम यांनी गेल्या वर्षी फ्लेमिंगोंच्या अधिवासाच्या दुर्दशेकडे दोनदा लक्ष वेधले होते.*

## पर्यावरणप्रेमी गटातर्फे आज तलावावर विजयी परेड

**नवी मुंबई :** डीपीएस फ्लेमिंगो संवर्धन राखीव जागेच्या अधिकृत मंजुरीचे औचित्य साधून, पर्यावरणप्रेमी गट रविवारी (दि.२०) सकाळी ८ ते ९ वाजेपर्यंत डीपीएस लेक, सर्व्हिस रोड (पाम बीच रोडजवळ) येथे विजयी परेड आयोजित करण्यात आली आहे.

सहभागींना फ्लेमिंगो-गुलाबी पक्षी पाहुण्यांसोबत प्रतीकात्मकपणे जुळण्यासाठी गुलाबी रंगाचा पसंतीचा ड्रेस कोड परिधान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे, असे आयोजकांनी सांगितले.

उपस्थितांना कार्यक्रमासाठी तीव्र उन्हापासून बचावासाठी स्वतःच्या टोप्या आणि पिण्याचे पाणी आणावे, असे आवाहन केले आहे. हा उत्सव नवी मुंबईच्या पर्यावरण चळवळीतील एक मैलाचा दगड आहे आणि नागरिकांना निसर्ग आणि वन्यजीव संरक्षणासाठी एकजुटीत सामील होण्यासाठी आमंत्रित केले आहे, असे नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी.एन. कुमार म्हणाले.

# वृक्षांवर खिळे ठोकून रोषणाई करणाऱ्यांवर होणार कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



शहरात वृक्षांवर खिळे ठोकून रोषणाई केली जाते. त्यामुळे महापालिकेने दंड आकारण्याच्या निर्णयाची सुरुवात केली. बेलापूर सेक्टर ३ येथील एका बार व रेस्टॉरंटवर झाडाला विद्युत रोषणाई केल्याने १० हजार रुपयांचा दंड वसूल केला असून पुढील आठवड्यात शहरात विशेष कारवाई मोहीम महापालिका हाती घेणार आहे.

वृक्षांवर खिळे ठोकणे व विद्युत रोषणाई यामुळे वृक्षांना धोका निर्माण होत असल्याने नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील वृक्षराजीवर परिणाम होऊन पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. म्हणून महापालिकेने नुकसान केल्यास प्रतिझाड १० हजार रुपयांप्रमाणे दंड आकारण्यात येणार असल्याचा निर्णय घेतला होता. पालिका वृक्ष प्राधिकरणाने नुकत्याच झालेल्या ठरावाप्रमाणे शहरातील वृक्षांवर खिळे ठोकणे, विद्युत रोषणाई करणे व वृक्षास इजा पोहचविणाऱ्या व्यक्ती, संस्था, व्यावसायिक यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याबाबत निर्णय घेतला. त्यानुसार अशा नागरिक, संस्था, व्यावसायिक यांच्याकडून प्रतिवृक्षाप्रमाणे १० हजार रुपये इतका दंड आकारणेबाबत साहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी यांच्यामार्फत कारवाई सुरू करण्यात आली आहे.

पालिकेच्या या निर्णयामुळे वृक्षांवर खिळे ठोकणे व विद्युत रोषणाई करून पर्यावरणास बाधक ठरणाऱ्या गैरप्रकारांना आता आळा बसेल तसेच शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या वृक्षांचे व पर्यावरणाचे रक्षण होईल अशी अपेक्षा आहे. यासाठी नागरिकांनी शहराच्या पर्यावरण रक्षण व संवर्धनासाठी पालिकेला सहकार्य करावे असे आवाहन केले आहे.

शहरात १९७ उद्याने असून २५२ रस्ता दुभाजक, ट्री बेल्ट व मोकळ्या जागा यांचे नैसर्गिक सौंदर्य अधिक वाढवण्याचा पालिकेचा प्रयत्न आहे. पालिका जास्तीत जास्त वृक्षलागवडीसाठी प्रयत्न करत असताना दुसरीकडे झाडांवर खिळे ठोकून जाहराती लावणे तसेच विद्युत रोषणाई करणे असे प्रकार वाढत असल्याने पालिकेने कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. बेलापूर ते वाशीदरम्यान सर्व विभागांत मोठ्या प्रमाणात झाडांवर रोषणाई तसेच खिळे ठोकून जाहिराती लावणे असे प्रकार पाहायला मिळत आहेत. या कारवाईचे नागरिक तसेच पर्यावरणप्रेमींकडूनही स्वागत करण्यात येत आहे.

### १५ लाखांहून अधिक वृक्षसंपदा

वृक्षगणनेच्या अहवालानुसार २१६ प्रजातींचे वृक्ष असून शहरात एकूण १५ लाख २८ हजार ७७९ वृक्षसंपदा आहे. तसेच शहरात एकूण १६३८ हेरिटेज वृक्ष आहेत. त्यामुळे पालिका क्षेत्रातील वृक्षसंपदेच्या जपणुकीसाठी पालिकेने कारवाईचे उचलेले पाऊल स्वागतार्ह असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.

**नवी मुंबई शहरात यापुढे झाडांना खिळे ठोकून जाहिराती लावणे, झाडांना विद्युत रोषणाई करणे असे प्रकार केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करून एका झाडामागे १० हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार असल्याचे जाहीर केले होते. त्याप्रमाणे पालिकेने बेलापूर विभागातून कारवाईला सुरुवात केली असून पुढील आठवड्यात संपूर्ण शहरात कारवाईची विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे.**
**-किसनराव पलांडे, उपायुक्त, नमुंमपा**

**नवी मुंबई शहरात वृक्षसंपदेवर विद्युत रोषणाई मोठ्या प्रमाणावर केली जाते तसेच झाडांना खिळे ठोकून जाहिराती लावल्या जातात. पालिकेने घसघशीत दंड आकारण्याचा निर्णय घेतला व त्याची अंमलबजावणी सुरु केली याचा आनंद आहे. सातत्याने अशी कारवाई व्हायला पाहिजे.**
**-आबा रणावरे, वृक्षप्रेमी**

## उन्हाळी फळांची आवक वाढल्याने एपीएमसीत गर्दी

# पोलिसांवर वाहतूक नियंत्रणाचा ताण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

उन्हाळी फळांची आवक मोठ्या प्रमाणात वाढल्याने त्याचा सर्वाधिक ताण एपीएमसी वाहतूक पोलिसांवर पडत आहे. एपीएमसी परिसरात दिवस-रात्र आवक सुरू असल्याने वाहतूक पोलिसांची दमछाक होत आहे. भर उन्हात रस्त्यावर उभे राहून वाहतूक नियंत्रण करावे लागत आहे. गेल्या काही आठवड्यांपासून मुंबई कृषी उत्पन्न बाजारपेठेत उन्हाळी फळांची आवक मोठ्या प्रमाणात वाढल्याने एपीएमसी परिसरात वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत होती. मात्र व्यवस्थित नियोजन आणि वाढीव बंदोबस्ताची साथ मिळाल्याने वाहतूक सुरळीत होत आहे.

फेब्रुवारीच्या शेवटी कलिंगड, अननस, खरबूज या फळांची आवक मोठ्या प्रमाणात झाल्याने वाहतुकीवर ताण पडला आहे. त्यात आता आंब्याची भर पडली आहे. एपीएमसी बाजारात दोनशे ते तीनशे ट्रक वाढल्याने परिसरात दुतर्फा पार्किंग करावी लागत आहे. या सर्वांचा ताण वाहतुकीवर पडला आहे. त्यात



रात्रभर कृषी मालाची आवक आणि दिवसभर माल उतरवणे, चढवणे तसेच अन्य वाहतूक असल्याने वाहतूक पोलिसांवर वाहतूक नियंत्रणाचा ताण पडत होता. त्यात ऊन कडक वाढल्याने अनेकांना त्रासही सुरू झाला होता. यावर उपाययोजना करताना मुख्यालयाकडून अतिरिक्त मनुष्यबळ मिळाल्याने थोडा भार हलका झाला आहे. त्यामुळे आता थेट रस्त्यावर उभे राहून वाहतूक नियंत्रित केली जात आहे.

वाहतूक नियंत्रणाचा सार्वधिक ताण हा तुर्भे स्मशानभूमी चौक, माथाडी चौक, सानपाडा चौक या ठिकाणी आहे. याशिवाय एपीएमसी आवारात बेकायदा पार्किंग करणाऱ्यांवर नजर ठेवावी लागते. त्यात मनुष्यबळ केवळ ३१ आहे. बीट चौकीत कायम तीन ते चार जण असतात. सुट्टीवर किमान पाच जण असतात. त्यामुळे प्रत्यक्षात २० /२१ कर्मचाऱ्यांवर काम भागवावे लागते. त्यात या ठिकाणी रात्रभर आणि दिवसाही मनुष्यबळ लागत असल्याने अतिरिक्त ताण पडतो. ही परिस्थिती ओळखून मागील आठवड्यात अतिरिक्त चार जणांची नेमणूक करण्यात आली आहे.

**मालाची आवक आणि उन्हाचा चढता पारा त्यामुळे ताण पडत असला तरी अतिरिक्त मनुष्यबळ दिल्याने आता ताण पडत नाही. वाहतूक नियंत्रणाचे काम सलग न देता ठरावीक वेळाने बदली केली जाते व कर्तव्य बजावणाऱ्याला काही वेळ आराम दिला जातो. तसेच उन्हापासून काही त्रास होऊ नये याची काळजी कशी घ्यावी याच्या सूचना केल्या जातात.**
**-शिवाजी भांडवलकर,** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाहतूक, एपीएमसी

## मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर एनएमएमटी बसमार्गाचे सुधारित वेळापत्रक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळ सेक्टर ४६-४८, नेरूळ बस स्थानक, सीबीडी, घणसोली - घरोंदा, पनवेल रेल्वे स्थानक, खारघर सेक्टर ३५, खारकोपर रेल्वे स्थानक या ठिकाणहून मंत्रालय (वर्ल्ड ट्रेड सेंटर) करिता वातानुकूलित बस सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

मार्ग क्र.१०६, मार्ग क्र.१०८, मार्ग क्र.११० व मार्ग क्र.११४ या मार्गाचे सुधारीत वेळापत्रक तयार करण्यात आले आहे.

मार्ग क्र. १०६ - पनवेल रेल्वे स्थानक ते मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर पनवेल रेल्वे स्थानक - रद्द केलेली फेरी : ७.२० - सुरू असलेली फेरी : ७.५० मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर - रद्द केलेली फेरी : १६.५० - सुरू असलेली फेरी : १८.२० तर मार्ग क्र. १०८ - नेरूळ सेक्टर ४६/४८ ते मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर नेरूळ सेक्टर ४६/४८ - रद्द केलेली फेरी : ७.५० - सुरू असलेली फेरी : ८.१५ मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर - रद्द केलेली फेरी : १७.१५ - सुरू असलेली फेरी : १८.३०

मार्ग क्र. ११० - खारघर सेक्टर ३५ ते मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर खारघर सेक्टर ३५ - रद्द केलेली फेरी : ७.१० - सुरू असलेली फेरी : ७.३० मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर - रद्द केलेली फेरी : १७.५० - सुरू असलेली फेरी : १८.४० तर मार्ग क्र. ११४ - घणसोली घरोंदा ते मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर घणसोली घरोंदा - रद्द केलेली फेरी : ७.४० - सुरू असलेली फेरी : ७.५५, ८.१० मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर - रद्द केलेली फेरी : १७.०५ - सुरू असलेली फेरी : १७.३५, १८.०५ तसेच मार्ग क्र.१०७ - सिबीडी - मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर, मार्ग क्र.११५ - खारकोपर रेल्वे स्थानक - मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर, मार्ग क्र.११६ - तुर्भे/नेरूळ - मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर मार्गे 'अटल सेतू' व मार्ग क्र.११७ - खारघर/पनवेल - मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर मार्गे 'अटल सेतू' या मार्गावरील कार्यान्वित वेळापत्रकात कोणताही बदल करण्यात आला नाही.

प्रवाशांनी सुधारीत वेळापत्रकाची नोंद घेवून सहकार्य करण्याबाबत परिवहन प्रशासनाने विनंती केली आहे.

# काळसेकर टेक्निकल कॅम्पसमध्ये शैक्षणिक कर्ज जागरूकता कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंजुमन-ए-इस्लामच्या काळसेकर टेक्निकल कॅम्पस (एआयकेटीसी), नवीन पनवेल येथे मौलाना आझाद अल्पसंख्याक वित्तीय विकास महामंडळ लिमिटेड (एमएएमएफडीसी)च्या सहकार्याने १२ एप्रिल २०२५ रोजी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना आर्थिक मदत संधींबद्दल माहिती देण्यासाठी आणि सक्षम करण्यासाठी शैक्षणिक कर्ज जागरूकता कार्यक्रम आयोजित केला.





या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र सरकार एमएएमएफडीसीचे अध्यक्ष आणि अंजुमन-ए-इस्लामचे वरिष्ठ उपाध्यक्ष मुश्ताक अंतुले उपस्थित होते, ज्यांनी प्रेरणादायी अध्यक्षीय भाषण दिले. अंजुमन-ए-इस्लामचे माननीय सरचिटणीस अकील हाफिज आणि बोर्ड ऑफ नवी मुंबई इन्स्टिट्यूटचे माननीय कार्यकारी अध्यक्ष बुरहान हॅरिस आणि अंजुमन-ए-इस्लामच्या तांत्रिक शिक्षण संचालक ऐनुल अत्तार पाहुणे म्हणून उपस्थित होते.

एमएएमएफडीसीचे उपव्यवस्थापक श्री. शकील शेख यांनी कर्ज अर्ज प्रक्रियेचे स्पष्टीकरण देणारे माहितीपूर्ण सत्र आयोजित केले. एमएएमएफडीसी टीम, ज्यामध्ये गफ्फर पीरसाब मकदूम (व्यवस्थापकीय संचालक), एन.आर. खान, अविनाश म्हात्रे, हसन जमादार आणि संदेश कदम यांचा समावेश आहे, त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि माहितीचे सुरळीत संकलन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

या कार्यक्रमात अंजुमन-ए-इस्लामचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. झहीर आय. काझी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली शैक्षणिक प्रवेश आणि समावेशनाला प्रोत्साहन देण्यासाठी अंजुमन-ए-इस्लामच्या सततच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकण्यात आला.

या कार्यक्रमाचे समन्वय प्राध्यापक तस्लीम पटेल, एआयकेटीसीचे संचालक डॉ. रमजान खटिक, विविध शाळांचे डीन आणि एचओडी, यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

क्लिक...क्लिक...!



पनवेल : चैत्र महिन्यामध्ये वातावरणातील प्रखर ऊन अतिशय अल्हाददायक वाटत असते. त्यामध्ये रस्त्याच्या दुतर्फा सावली देणारी झाडे आणखी निसर्गसौंदर्य खुलवत असतात.




उरण : बाजारपेठेतील राजपाल नाका येथील राईट चॉइस एनएक्स किड्स वेअरचे उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाले. या वेळी राईट चॉइस एनएक्स किड्स वेअरचे मालक रमेश गोठी, हस्तीमल मेहता, भाजप शहर अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह, माजी नगरसेवक नवीन राजपाल, हितेश शाह, शक्ती सिंह, अनिल सिंह, गौतम हथियानी आदी उपस्थित होते.

# खंडित वीजपुरवठ्याने महाडकर हैराण

## भूमिगत वीजपुरवठा करणाऱ्या केबलमध्ये बिघाड; ऐन उन्हाळ्यात नागरिकांना मनस्ताप



**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यात गेले काही महिने सातत्याने वीजपुरवठा खंडित होत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे नागरिकांसह लघु उद्योगांना मोठा फटका बसत आहे. भूमिगत वीजपुरवठा करणाऱ्या केबलमध्ये बिघाड झाल्याचे महावितरण कंपनीने स्पष्ट केले असले तरी सातत्याने वीजपुरवठा खंडित का होत आहे याबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे.

ग्रामीण भागात वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण अधिक आहे. एकीकडे तापमान वाढले असतानाच वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. शहर तसेच ग्रामीण भागात असलेल्या लघु उद्योगांना याचा फटका बसत असून याबाबत महावितरण विभागाकडून ठोस कारवाई केली जात नाही.

महाड तालुक्यात शुक्रवारी रात्रीपासून खंडित झालेला वीजपुरवठा दुसऱ्या दिवशी दुपारनंतरदेखील पूर्ववत न झाल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. महावितरण विभागाकडून महाड औद्योगिक वसाहतीमध्ये अंडरग्राउंड असलेल्या केबलमध्ये बिघाड झाल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले. हा बिघाड नेमका कशामुळे झाला आहे याचा तपास सुरू असून पूर्ववत होण्यास अधिक का लागणार असल्याचेही सांगण्यात आले.

महाड एमआयडीसीमध्ये रस्त्याचे काम सुरू असून होत असलेल्या खोदकामामुळे सातत्याने हा बिघाड होत असल्याचे नागरिकांकडून म्हटले जात आहे. या खोदकाम करणाऱ्या कंपनीवर महावितरण विभाग कारवाई करणार, का असा प्रश्न देखील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

ग्रामीण भागामध्ये हे प्रमाण अधिक असून सातत्याने वीजपुरवठा या ना त्या कारणामुळे सतत खंडित केला जात आहे. ग्रामीण भागामध्ये उन्हाळ्यामध्ये आणि रात्रीच्या सुमारास वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. जाणीवपूर्वक हा वीजपुरवठा खंडित केला जात असल्याचा आरोप देखील नागरिकांकडून केला जात आहे. महावितरण विभागाकडून वीज बिल वसुली करताना काटेकोरपणे केली जात असली तरी वीजपुरवठा करताना मात्र हेळसांड केली जात असल्याचे स्पष्ट होत आहे. या संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.

## रायगडची ऋचा दरेकर लष्करात कॅप्टनपदी नियुक्त

**खालापूर : प्रतिनिधी**



रायगडमधील ऋचा कृष्णकांत दरेकर यांची भारतीय लष्करात कॅप्टन पदावर नियुक्ती झाल्याने पळसदरी (ता. कर्जत) या त्यांच्या मूळ गावी व परिसरात आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

ऋचाने प्राथमिक शिक्षण शिशुमंदिर खोपोली, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पनवेलमधील बार्न्स हायस्कूलमध्ये पूर्ण केले. शालेय जीवनातच तिने तलवारबाजी क्रीडा प्रकारात जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदके पटकावत आपली प्रतिभा सिद्ध केली तसेच रसायनी येथील पिल्लई कॉलेजमधून इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगची पदवी घेतली.

पुढे ऋचाने सीडीएस परीक्षा आणि एएसबी मुलाखत उत्तीर्ण होत चेन्नईच्या ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमीतून प्रशिक्षण पूर्ण केले. त्या वेळी तिला लेफ्टनंट ऑफिसर म्हणून नियुक्त करण्यात आले होते. प्रशिक्षण आणि सेवा काळातील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारावर आता ऋचाची कॅप्टन पदावर पदोन्नती झाली आहे. तिच्या या यशाचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## माणगाव येथील श्री दत्त मंदिराचा जत्रोत्सव



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री दत्त मंदिराचा जत्रोत्सव कार्यक्रम २२ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरा होणार असून या जत्रोत्सवात यात्रेकरूंनी सहभागी होऊन उत्सवाचा मनमुराद आनंद घ्यावा, असे आवाहन जत्रोत्सव कमिटीचे अध्यक्ष अ‍ॅड. केदार गांधी व सहकाऱ्यांनी केले आहे.

या संदर्भात माणगाव येथील अ‍ॅड. गांधी यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीला नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, अमोल मोने, तेजस गांधी, काशीराम पोवार, अनंता पोवार, गोविंद पोवार, महेंद्र मेथा, नामदेव खराडे, सचिन देसाई, सुधाकर पालकर, संतोष मांजरे आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. या वेळी अ‍ॅड. केदार गांधी यांनी, दत्त मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

## रोह्यात सरपंचपद आरक्षण सोडत

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील एकूण ६४ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत काढण्यासाठी २२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे सभा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर सरपंचपद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित असेल हे निश्चित करण्यास आरक्षण सोडत आहे.

## संभाजी ब्रिगेडच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

**माणगाव : बातमीदार**



संभाजी ब्रिगेड रायगड जिल्हा अंतर्गत महाड तालुका कार्यकारिणीच्या कामाचा आढावा, पुनर्गठन-पुनर्बांधणीसंदर्भात तसेच इतर संघटनात्मक बाबींसंदर्भात रायगड जिल्हाध्यक्ष वैभव सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली महाड शासकीय विश्रांतीगृह या ठिकाणी बैठक झाली.

या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, सभासद तसेच नवीन कार्यकारिणीत काम करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दाखवली. दरम्यान, महाड तालुका अंतर्गत विविध पदांवर नियुक्त्या करून संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यात आली. या वेळी संभाजी ब्रिगेड महिला आघाडीचीही स्थापना करून महिलांची नियुक्ती करण्यात आली.

बैठकीस रायगड जिल्हा कार्याध्यक्ष अरुण मोहिते, महाड तालुका अध्यक्ष कैलास अटक, पोलादपूर तालुका अध्यक्ष अमित वाडकर, महाड तालुका सचिव नितेश पवार, उपाध्यक्ष सुजित सुतार, पोलादपूर विभागीय अध्यक्ष स्वप्नील सकपाळ, महाड शहर अध्यक्ष महेश मेहता, शिवमती रजनी खेडेकर,जयश्री गजमल, शुभांगी पवार, सुनंदा कदम, अपूर्वा पवार, रागिणी भोसले, वैष्णवी बटवले, प्रियांका चौधरी, स्नेहल भोसले, प्रणिता मोरे, रेखा पार्टे, पूजा यादव, निकिता जाधव, भारती पवार आदी उपस्थित होते.

या वेळी महाड शहर संघटकपदी संदेश मोरे, महिला आघाडी जिल्हा संघटकपदी हर्षदा सुतार, महाड तालुका अध्यक्षपदी नंदा काप, उपाध्यक्ष प्रणिता मोरे, शहर अध्यक्ष पूजा यादव, तालुका संघटक प्रियंका चौधरी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या.

## पाले येथे भवानी मातेचा पालखी सोहळा उत्साहात

**धाटाव : प्रतिनिधी**



रोहा तालुक्यातील अवचितगडाच्या समोरील टेकडीवर वसलेल्या पाले या गावामध्ये भवानी मातेचा पालखी उत्सव आनंदात साजरा करण्यात आला. वाजत गाजत भवानी मातेची पालखी काढण्यात आली होती.

या सोहळ्यास मंडळ अधिकारी (निडी तर्फे अष्टमी) जयेश ठाकूर, मेढा तलाठी अक्षया गोसावी, पोलीस निरीक्षक मारुती पाटील, पोलीस अधिकारी जयेंद्र पेडवी उपस्थित होते. पोलीस पाटील संकेत कोतवाल, महसूल सेवक राजेश काशीद, हरिश्चंद्र ठमके, ज्येष्ठ ग्रामस्थ मधुकर खांडेकर, सुदाम खांडेकर, भगवान खांडेकर, खेळू खांडेकर, निलेश खांडेकर यांनी शासकीय, कर्मचारी यांचे स्वागत केले.

या पालखी उत्सवासाठी तहसीलदार किशोर देशमुख यांनी ग्रामस्थांना इथून पुढेही एकजूट राहून असेच उत्सव साजरा करा, अशा शुभेच्छा दिल्या. पालखी उत्सवाला माजी आमदार अनिकेत तटकरे, युवा कार्यकर्ते मयूर खैरे यांनी भेट देत दर्शन घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राकेश खांडेकर यांनी केले. तेरा वर्षांनी पालखी सोहळा पुन्हा सुरू झाल्याने महिलावर्ग, माहेरवाशिणी, लहान थोर मंडळी यांनी भाग घेऊन तो एकत्र मिसळून साजरा केला.

## विजयशेठ मेथा यांना पुरस्कार जाहीर

**माणगाव : प्रतिनिधी**

पुणे येथील केपीएम मीडिया या कंपनीतर्फे माणगाव येथील धनंजय राईस मिलचे मालक तथा सामाजिक कार्यकर्ते व प्रसिद्ध उद्योजक खेमचंद (विजयशेठ) चुनीलाला मेथा यांना महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण रविवारी (दि. २०) राजमुद्रा बँक्वेट्स, हिंजेवाडी-पुणे येथे होणाऱ्या समारंभात मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.



उद्योजक विजयशेठ मेथा हे गेल्या अनेक वर्षांपासून उद्योग क्षेत्रात कार्यरत असून तळेगाव येथे त्यांच्या मालकीची धनंजय राईस मिल आहे. व्यवसाय सांभाळून ते सामाजिक क्षेत्रात काम करीत असतात. विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे गेली शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या सहकार्याने माणगावात प्रत्येक महिन्याला मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिराचे आयोजन केले जाते. याचबरोबर ते विविध सामाजिक संस्था, संघटनांचे प्रतिनिधी म्हणूनही सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होत असतात. पुरस्काराबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## नारळाच्या शहाळ्यांना वाढती मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**



अलिबाग तालुक्यातील रेवदंडा, चौल, नागाव परिसरात शहाळे विक्रेते सध्या भलतेच तेजीत असून सुट्टीनिमित्त आलेले पर्यटक, पै-पाहुण्यांसह स्थानिकांची शहाळ्याच्या पाण्याला मोठी मागणी आहे.

ओल्या नारळास शहाळे म्हणतात. याचे पाणी थंड, शक्तीवर्धक व खजिनसंपन्न असते. आजारी, अपचन, जुलाब झालेल्या व्यक्तींना शहाळ्याचे पाणी वरदान असून त्यातील पोषक तत्वे आरोग्यास हातभार लावतात आणि शरिरातील द्रव्य संतुलन राखण्यास मदत करतात.

नारळ पाणी हे एक नैसर्गिक स्पोर्ट्स ड्रिंक आहे, जे आपल्या शरीराला केवळ हायड्रेट ठेवत नाही तर भरपूर उर्जादेखील देते. शक्यतो वर्कआउट केल्यानंतर शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स नष्ट झालेले असतात व शरीर थकल्यासारखे होते. त्या वेळी नारळ पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. नारळाचे पाणी हायड्रेशन प्रदान करते, वजन कमी करण्यास मदत करते, हृदयाच्या आरोग्यास समर्थन देते, पचन सुधारते, प्रतिकार शक्ती वाढवते, आणि निरोगी त्वचा आणि केसांना प्रोत्साहन देते.

शहाळ्याच्या पाण्यात कमी सोडियम आणि जास्त पोटॅशियम असते, ज्यामुळे रक्तदाबावरील सोडियमचा प्रभाव संतुलित होण्यास मदत होते. एक कप नारळाचे पाणी साधारणतः ६०० मिलीग्रॅम पोटॅशियम देऊ शकते तसेच कॅल्शियम हाडे आणि दात मजबूत करण्यास मदत करते.

शहाळ्याचे पाणी पिण्याने किडनीचे आरोग्य सुधारते, वजन कमी करण्यास मदत होते, आपळी त्वचा छान होते, पोटाचे आरोग्य विशेषत: पचन सुधारते तसेच रोगप्रतिकार शक्ती वाढते व शरीरातील पोषण तत्वांची कमतरता पूर्ण होते. नारळाच्या शहाळ्याची ४० ते ५० रुपये प्रती नग दराने विक्री केली जात आहे. अलिबाग ते मुरूड या दोन्ही तालुक्यात ठिकठिकाणी शहाळी विक्रेते या व्यवसायातून मोठी आर्थिक उलाढाल करीत आहेत.

## रेवदंडा समुद्र चौपाटी गजबजतेय!

### स्थानिकांसह पर्यटक, पै-पाहुणे यांची गर्दी

**रेवदंडा : प्रतिनिधी**



वातावरणातील वाढत्या उष्माने हैराण झालेले स्थानिक, पर्यटक व पै-पाहुणे सध्या झुळझूळणारा वारा अंगावर घेत सुट्टीचा आगळावेगळा आस्वाद घेण्यासाठी सायकांळी रेवदंडा समुद्र चौपाटीवर दिसून येत आहेत.

एप्रिल व मे महिन्यातील सुट्टीनिमित्त मोठ्या संख्येने पै-पाहुणे तसेच चाकरमनी यांचे रेवदंडा, चौल परिसरात आगमन झाले आहे. त्यांच्यासह स्थानिक लोक व पर्यटक हे सायकांळच्या सुमारास रेवदंडा समुद्र चौपाटीवर मऊशार वाळू, झुळझुळणारा वारा आणि फेसाळलेल्या लाटा अंगावर घेत स्वच्छंद आनंद लुटण्यासाठी पसंती देतात.

रेवदंड्याची लांबलचक समुद्र चौपाटी पर्यटक, पै-पाहुणे यांच्यासाठी खास आकर्षण आहे. येथील समुद्राच्या पाण्यात पोहताना आजपर्यंत कोणतीही दुर्घटना झाली नसून सुरक्षित समुद्र किनारा म्हणून रेवदंडा समुद्र चौपाटीची ओळख आहे. समुद्र चौपाटीसह आगरकोट किल्ला तटबंदीसुद्धा मनाला आनंद देते.

उन्हाळी सुट्टीत बच्चेकंपनीची मोठी रेलचेल येथे दिसते. मुले फुटबॉल, हॉलिबॉल, क्रिकेट खेळताना समुद्र चौपाटीवर दिसतात. दिवसभर वातावरणातील उष्माने हैराण झालेले अनेक जण सागराच्या फेसाळणाऱ्या लाटा अंगावर घेत पोहण्याचा आनंद मनमुरादपणे लुटतात. चौपाटीवर भेळ खाणे, सरबत पिणे आदीची मज्जाही वेगळीच असते.

हल्ली रेवदंडा समुद्र चौपाटीसाठी वर्षभर पर्यटक भेटीस येतात, स्थानिक कॅम्पिंग व्यवसायिक हे रेवदंडा समुद्र चौपाटी व आगरकोट किल्ला यांचे खास आकर्षण पर्यटकांमध्ये निर्माण करण्यात यशस्वी झाले आहेत. त्यामुळे दर शनिवार व रविवार मोठी गर्दी येथील चौपाटीवर दिसून येते.

## सुधागड तालुक्यात भीम जयंती साजरी

**पाली : प्रतिनिधी**



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती पालीसह सुधागड तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

सुधागडातील भेरव, नवघर, वाघोशी, परळी भीमनगर, महागाव, आसरे, भार्जे, कानसळ, नाणोसे, पाच्छापूर, उद्धर, कुंभारशेत, महागाव, खवली, धोंडसे, नाडसुर व इतर गावोगावी भीम अनुयायांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करून विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम राबविले.

सुधागड तालुका बौद्धजन पंचायत कमिटीच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह पाली येथे डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन केले. कमिटीचे अध्यक्ष दीपक पवार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. या वेळी सकाळी ध्वजारोहण करण्यात आले. संस्थेचे आजी माजी पदाधिकारी, बौद्धाचार्य, भीम अनुयायी यांच्या समवेत विधी संचलन झाले. यानंतर मान्यवरांनी उपस्थितांना महामानवाचा जीवनपट सांगून प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले.

भीमशक्ती मित्रमंडळ व माता रमाई महिला मंडळ भीमनगर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी सकाळी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून करून बौद्धचार्यांच्या उपस्थितीत पूजापाठ घेण्यात आला. सायंकाळी वाद्यांच्या गजरात महामानवाच्या प्रतिमेची भीमनगर ते परळी अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली, तर रात्री भोजनानंतर महाराष्ट्राचे गायक कुणाल बोधडे व गायिका साधना मेश्राम यांचा भीमगीतांच्या कव्वालीचा कार्यक्रम रंगला.

# पंजाबची आरसीबीवर मात

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

पावसाचा व्यत्यय आलेल्या १४ षटकांच्या लो स्कोअरिंग आयपीएल साखळी सामन्यात पंजाब किंग्जने रॉयल्स चॅलेंजस बंगळुरूला घरच्या मैदानावर हरवले. या लढतीत आरसीबीला प्रथम फलंदाजी करताना निर्धारित १४ षटकांत नऊ बाद ९५ धावांपर्यंत मजल मारली होती. त्यानंतर पंजाबने १२.१ षटकांत पाच बाद ९८ धावांसह विजय मिळवला. नेहल वधेराची १९ चेंडूंत नाबाद ३३ धावांची खेळी निर्णायक ठरली.



विजयासाठी १४ षटकांत ९६ धावांचे तुलनेने किरकोळ आव्हान असताना पंजाबचीदेखील सुरुवात खराबच झाली. प्रियांश आर्य (१६) व प्रभसिमरन सिंग (१३) हे दोन्ही सलामीवीर स्वस्तात बाद झाल्याने ३.४ षटकांत दोन बाद ३२ अशा बिकट स्थितीत हा संघ होता. कर्णधार श्रेयस अय्यर (७) व जोश इंग्लिस (१४) हेदेखील स्वस्तात बाद झाले. मोक्याच्या क्षणी नेहल वधेराने १९ चेंडूत ३३ धावांची बरसात करीत पंजाबला एककलमी वर्चस्व प्राप्त करून दिले.

पावसाने व्यत्यय आलेल्या या सामन्यात पंजाबने नाणेफेक जिंकून आरसीबीला प्रथम फलंदाजीला पाचारण केले आणि त्यांच्या गोलंदाजांनी हा निर्णय सार्थही ठरवला. फिल सॉल्ट (४) व विराट कोहली (१) हे दोन्ही खंदे सलामीवीर स्वस्तात बाद झाल्यानंतर तोच कित्ता मधल्या व तळाच्या फलंदाजांनी गिरवला आणि यामुळे पाहता पाहता आरसीबीचा डाव गडगडत राहिला.

मधल्या फळीत रजत पाटीदारने १८ चेंडूंत २३ धावा केल्या. तो सेट होईल असे वाटत असतानाच त्याने आपली विकेट फेकली. लिव्हिंगस्टोन (४), जितेन शर्मा (२), कृणाल पंड्याही (१) स्वस्तात बाद होत गेले. एकवेळ तर आरसीबीचा संघ ११.५ षटकात ९ बाद ६३ अशा बिकट स्थितीत होता. त्यानंतर अर्धशतकवीर टीम डेव्हिडने सर्व सूत्रे आपल्या हाती घेत २६ चेंडूंत नाबाद ५० धावांचे योगदान दिले आणि यामुळे आरसीबीला नव्वद धावांचा टप्पा पार करता आला होता.

# क्रिकेट स्पर्धेत पनवेल पोलीस ठाण्याचा संघ विजेता

**पनवेल : वार्ताहर**

पत्रकार मित्र असोसिएशन, आपला आधार फाउंडेशन, श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्टतर्फे आयोजित महिला लोकसेवा चषक क्रिकेट स्पर्धेत पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला.



स्पर्धेत एकूण सहा संघ सहभागी झाले होते. द्वितीय क्रमांक कामोठे पोलीस ठाण्याच्या संघाने, तर डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

बक्षीस वितरण मोहिनी विक्रांत पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे, कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक विमल बिडवे, पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संजय पाटील, निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ. पल्लवी पाटील, उपजिल्हा रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अशोक गीते, डॉ. प्रमोद पाटील, जीवन कोंडीलकर आदी उपस्थित होते. विजेत्या संघांना बक्षीस देण्यात आले. अष्टपैलू खेळाडू उषा कोरडे, उत्कृष्ट फलंदाज श्रीवंता सूर्यवंशी व उत्कृष्ट गोलंदाज तेजस्विनी काशीद यांनाही गौरविण्यात आले.

# कर्जतमध्ये क्रिकेट प्रीमियर लीगचे उद्घाटन

**कर्जत : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कर्जत नगर परिषद अंडरआर्म बॉक्स क्रिकेट प्रीमियर लीग २०२५ –पर्व २ या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन झाले.



कर्जत शहरातील पोलीस मैदानात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून उपजिल्हाप्रमुख भाई गायकर आणि माजी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले.

उद्घाटन समारंभास माजी नगरसेवक अॅड. संकेत भासे, अभिषेक सुर्वे, दिनेश कडू, संजय मोहिते, प्रदीप वायकर, नजीम खान, अशोक मोरे, वैभव सुरावकर, ज्ञानेश्वर कर्णूक आदी उपस्थित होते.

या वर्षीच्या पर्वात तब्बल ३२ संघांनी सहभाग नोंदवला असून उद्घाटनावेळी शिवसेना कर्जत शहर पदाधिकारी, संघमालक, खेळाडू व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रायगडच्या सृष्टी भोईरची डब्ल्यूएमपीएलमध्ये निवड

**खालापूर : प्रतिनिधी**



वूमन्स महाराष्ट्र प्रीमियर लीग (डब्ल्यूएमपीएल) च्या पहिल्या पर्वामध्ये रायगडच्या सृष्टी महेंद्र भोईर हिची रत्नागिरी जेट्स संघात निवड झाली आहे. या संघाची कर्णधार भारताची यशस्वी सलामीवीर स्मृती मंधना आहे.

सृष्टी कर्जत तालुक्यातील डिकसळ गावची कन्या असून ती गोलंदाजी करते. डब्ल्यूएमपीएल या मानाच्या स्पर्धेत रायगड जिल्ह्यामधून प्रथमच निवड होण्याचा मान सृष्टीस मिळाला आहे. याबद्दल सर्व स्तरांतून तिचे अभिनंदन होत आहे.

# लायन्स क्लबतर्फे बुद्धीबळ स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



लायन्स क्लब न्यू पनवेल स्टिल टाऊनच्या वतीने १८ मे रोजी नवीन पनवेल येथे बुद्धीबळ स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सेक्टर १३ येथील कालीमाता मंदिराच्या हॉलमध्ये ही स्पर्धा सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत खेळली जाईल.

स्पर्धेसाठी प्रवेश अर्जाचे फॉर्म नवीन पनवेल येथील श्याम भुतडा यांचे आयडियल युनिफॉर्म शॉप, शिवा कॉम्प्लेक्स (९८२०१९१२१४) तसेच माथेरान रोड, आदई सर्कलजवळील अतुल आईस्क्रीम दुकानात (९६१९२४२७९२) सकाळी १० ते सायंकाळी ७पर्यंत उपलब्ध आहेत.

स्पर्धा १० वर्षाखालील, ११ ते २० वर्ष आणि २१ वर्षावरील अशा तीन वयोगटात होईल. स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन लायन्स क्लब न्यू पनवेल स्टील टाऊन अध्यक्ष मिनाक्षी भटनागर, डायरेक्टर यशवंत ठाकरे व सहकाऱ्यांनी केले आहे.

## रजत पाटीदारने सचिनला टाकले मागे

**मुंबई** : आयपीएलच्या साखळी सामन्यात पंजाबने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूवर पाच विकेट्सनी विजय मिळवला. असे असले तरी आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदार याने या सामन्यात एक पराक्रम केला आहे.

रजतने १८ चेंडूत २३ धावांची खेळी केली. यात एक षटकार व एका चौकाराचा समावेश होता. त्याने आयपीएलच्या इतिहासात एक हजार धावा पूर्ण केल्या. यामुळे तो दुसरा एक हजार सर्वात जलद धावा करणारा भारतीय खेळाडू ठरला. त्याने सचिन तेंडुलकर आणि ऋतुराज गायकवाड (दोघांनी ३१ डाव खेळून) आणि तिलक वर्मा (३३ डाव) यांना मागे टाकले आहे.




# केएल राहुल बनला ‘सिक्सर किंग’

## धोनी, कोहलीला टाकले मागे

**नवी दिल्ली** : यंदाच्या आयपीएल हंगामात दिल्ली कॅपिटल्सचा स्टार फलंदाज केएल राहुल फॉर्ममध्ये आहे. त्यांची फलंदाजी बहरली असून शनिवारी (दि.१९) गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात त्याने एक मोठी कामगिरी केली. तो आयपीएलमध्ये कमी डावात सर्वाधिक षटकार मारणारा फलंदाज बनला आहे.

मागील हंगामात केएल राहुल हा लखनऊ सुपर जायंट्स संघाचे प्रतिनिधित्व करत होता. यंदाच्या हंगामात त्याने दिल्ली कॅपिटल्ससाठी उत्कृष्ट फलंदाजी करताना दिसत आहे. गेल्या सहा डावांमध्ये त्याने २६६ धावा केल्या आहेत. यामध्ये दोन अर्धशतकी खेळींचाही समावेश आहे. आता तो आयपीएलमध्ये सर्वात कमी डावात २०० षटकार मारणारा फलंदाज बनला. त्याने १२९ डावांमध्ये ही कामगिरी केली. त्याने महेंद्रसिंह धोनी आणि विराट कोहलीसारख्या फलंदाजांनाही मागे टाकले आहे.

# मुंबई टी-२० लीगमधील संघमालकावर बंदी

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलचा थरार सुरू असताना भारतीय नियामक मंडळ म्हणजेच बीसीसीआयने मोठी कारवाई केली आहे. बीसीसीआयने मुंबई टी–२० लीगच्या संघाचे माजी सहमालक गुरमीत सिंग भामराह यांच्यावर आजीवन बंदी घातली. त्यांच्यावर मॅच फिक्सिंगचा आरोप करण्यात आला आहे.

हे प्रकरण २०१९मध्ये खेळल्या गेलेल्या मुंबई टी–२० लीगच्या हंगामातील उपांत्य सामन्याशी संबंधित आहे. गुरमीत यांनी सामना फिक्स करण्यासाठी खेळाडूंशी संपर्क केला. त्यानंतर खेळाडूने संबंधित एजन्सींकडे याबाबत तक्रार केली. या प्रकरणात गुरमीत दोषी आढळल्यानंतर त्यांच्यावर आजीवन बंदी घालण्यात आली, अशी माहिती बीसीसीआयचे लोकपाल न्यायमूर्ती अरूण मिश्रा यांनी दिली.

याआधी बीसीसीआयच्या भ्रष्टाचार विरोधीपथकाने गुरमीत यांच्याविरुद्ध चौकशी केली, ज्यात ते दोषी आढळले. त्यानंतर हे प्रकरण लोकपालपर्यंत पोहचले होते. त्यानंतर कारवाई झाली आहे.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com